मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः।

# हितगुज

अंक ७४ ❖ संपादिका: डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०) ❖ जून २००८

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल: maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.) (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय भूमिका



संपादिका: डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे

प्रिय कुलबांधव आणि भगिनीना माझा स्नेहपूर्वक नमस्कार.

ज्या 'हितगुज' अंकाची आपण आतुरतेने वाट पहात आहात त्याला विलंब होतो आहे, वेळेवर आपल्या घरी तो येत नाही, आपल्या हातात पडत नाही याविषयी मी दिलगिरी व्यक्त करते. 'ना खंत ना खेद' असा स्वभाव नसल्यामुळे मला स्वतःला संपादिका म्हणून माझ्यावर काही दायित्व आहे याची पूर्ण जाणीव आहे. अंकाच्या छपाई व वितरणामध्ये काही त्रुटी होत्या त्या आता दूर झाल्या असून हा आणि यानंतरचे अंक वेळेवर मिळतील असे मी आपणास आश्वासन देते. साता समुद्रापलिकडे राहाणारे ज्येष्ठ सदस्य, 'भीष्मपितामह' श्री. भाऊसाहेब हेही हितगुजकडे कसे डोळे लावून वाट पहात असतात हे आपणास मागील अंकात त्यांचे पत्र छापले आहे यावरून समजले आहेच.

(पुढील मजकूर पृ. ७ वर)



*(स्वातंत्र्यवीर वि.दा.तथा तात्याराव सावरकर यांच्या १२५ व्या जन्मवर्षानिमित्त गेले वर्षभर त्यांच्याविषयीचे लेख हितगुजमधून देऊन आपण त्यांना श्रद्धा-सुमने अर्पण केली. याच मालिकेतील 'एक हृद्य आठवण' हा मूळचे शिवाजीपार्क, दादर-निवासी व आता पुणेकर ज्येष्ठ भूलतज्ज्ञ डॉ. शरच्चंद्र मराठे यांचा खास लेख सोबत दिला आहे. तात्यारावांच्या अंतकाळी ज्या मोजक्या लोकांना त्यांची सेवा करण्याचे परमभाग्य लाभले त्यापैकी आपले डॉ. मराठे हे एक होते हे वाचून आपली कॉलर ताठ होईल. ही आठवण म्हणजे एका भूलशास्त्रतज्ज्ञाने आपले सारे कौशल्य पणाला लावून काळाशी केलेल्या अखेरच्या झटापटीच्या रोमहर्षक प्रसंगाचे वर्णन त्यांच्याच शब्दात वाचा -सहसंपादक सी. गो. खांबेटे )*

> शस्त्रबळाशिवाय धर्मविजय पंगू असतो. धर्मबळावाचून नुसता शस्त्रविजय पाशवी असतो. -स्वातंत्र्यवीर सावरकर

## स्वा. सावरकरांच्या आत्मार्पणकाळातील एक हृद्य आठवण

-डॉ.शरच्चंद्र दत्तात्रेय मराठे,
८६ रामबाग कॉलनी, ४-बी दशभुजा सोसायटी, पौड रोड, कोथरूड,पुणे ४११०३८ दूरध्वनी-९५२०-२५४२३४०१

स्वातंत्र्यवीर सावरकर आमच्या गल्लीतच ४-५ बंगले सोडून रहात असत. लहानपणापासून सावरकर सदनाबद्दल आदरयुक्त कुतूहल आणि धाक वाटत असे. त्यांच घर शिवाजी पार्क, मुंबई येथे भरवस्तीत असूनही एकांतात असल्यासारखे वाटे. जानेवारी - फेब्रुवारी १९६६ च्या सुमारास वृत्तपत्रांतून आत्मार्पणासंबंधी लेख लिहून त्या मुद्याचे सावरकरांनी समर्थन केले आणि तद्नंतर त्यांनी अन्नपाणी वर्ज्य केले. माझ्या परमभाग्यामुळे ह्या कालखंडात माझ्या वैद्यकीय मित्रांसमवेत तात्यारावांची सेवा करण्याचे सद्भाग्य लाभले. मी, डॉ. सुभाष पुरंदरे, डॉ. अरविंद गोडबोले, डॉ. अविनाश गोडबोले आणि तात्यारावांचे भाचे नाशिकचे डॉ. काळे असे आम्ही आळीपाळीने त्यांच्यावर अहोरात्र लक्ष ठेऊन असू. डॉ. आर्. व्ही. साठे आम्हांला मार्गदर्शन करीत होते.

एकदा आम्हा सर्वांना तात्यारावांचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. तात्यारावांच्या खोलीमध्ये


(पुढील मजकूर पृ. ६ वर)

मराठे प्रतिष्ठान पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र.ई.७९१८(मुं.दि.१२-१-१९८१)मराठे उद्योग भवन,आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी,मुंबई ४०००२५.दूरध्वनी:२४३०२४५३


❖ संपादकीय सहाय्य व अक्षरजुळणी :सीताराम गोपाळ खांबेटे(पृ.६७६)❖

पत्रव्यवहाराचा पत्ता:(१)संपादिका:डॉ.सौ.सुमेधा प्र.मराठे ८/१३,सहकार नगर, वडाळा-प.मुंबई ४०००३१;F२४१५०८८९
ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
(२)सहायक संपादक:श्री.सीताराम गो.खांबेटे ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९.F:२६८३६९१४
सेल-९८३३५६४२६८; ई-मेल :(1) sitaram_khambete@yahoo.com (2) maratheparivar@yahoo.co.in

रंगावली




पाणवठा






# मी कलासाधक

-कुमुद सुदाम(मराठे)डोके,(पृ.३६६)जी.डी.ए.,आर्ट मास्टर एम.ए.
बी -२, रौनक पार्क, पोखरण रोड नं. २, ठाणे ४००६०७ ; दूरध्वनी : ०२२-२५३९९९८१

*(श्रीमती कुमुद डोके, या डोंबिवली येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात कलाध्यापक म्हणून अनेक वर्षे कार्यरत असून त्यांना त्यांच्या चित्रप्रदर्शनासाठी नाशिक, पुणे, हैदराबाद, उज्जैन अशा विविध ठिकाणांहून पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या 'रेखांकिता' या भारतीय स्त्री दिनक्रमावर आधारित लघुचित्र मालिकेचा विशेष उल्लेख करावयास हवा. त्यांचे एक कलासाधक या नात्याने व्यक्त केलेले खालील विचार कलाप्रेमी वाचक-सदस्यांना प्रेरणादायी वाटतील. हितगुजसाठी त्यांनी खास भेट म्हणून पाठविलेल्या 'रेखांकिता' या पुस्तकांतील कलात्मक रेखाटनांची एक झलक येथे दाखविली आहे.-सहसंपादक सी. गो. खांबेटे)*

भारतामध्ये जन्म घेणे हा आपल्या मानवजन्माचा जणू गौरवच आहे. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीत आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास होणे, हा खरोखर दुग्धशर्करा-योग म्हणावा लागेल. अशा गौरवपूर्ण व परिपूर्ण वातावरणात सुयोग्य नागरी गुणांचा, कलांचा ज्ञानविज्ञानाचा विकास निकोप होत असतो. भारतीय म्हणून, उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत व पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत वैविध्याने नटलेल्या, परंतु एकाच अध्यात्मिक धाग्यात गुंफलेल्या या संस्कृतीने अनेक नर व नारीरत्ने घडविली आहेत. याचा साकल्याने विचार करता चाळीस वर्षामागे म्हणजे माझ्या बालवयात घडलेल्या अनेक साध्यासुध्या प्रसंगात व त्यामुळे माझ्या बालमनावर झालेल्या संस्कारात तो आढळतो.

भारतीय ललितकला म्हटल्या की संगीत, नृत्य, नाट्य, चित्र व शिल्प यांचा एकमेकांत गुंफलेला जणू गोफच भावतो. प्रत्येक कला, एक दुसरीला किती पोषक आहे याचा पदोपदी प्रत्यय येतो. साधीसुधी वाटणारी आपल्या दारापुढील सुरेख रांगोळी लयदार, बारीक, सफाईदार रेषांमुळे मन प्रसन्न करतात. त्यांतील गोजिरे आकार बोटांना प्रवाही बनवितात. गृहिणीची कलात्मक दृष्टी अभ्यागताचे लक्ष वेधून घेते. रांगोळीच्या बारीक रेषा काढणे, सुंदर रंग भरणे हा पहिला संस्कार मला माझ्या आईकडून मिळाला.

आम्ही पुण्यात शनिवारपेठेत वयाच्या वीस वर्षांपर्यंत पुलंच्या 'बटाट्याच्या चाळी' प्रमाणे असणाऱ्या अठरापगड शेजाऱ्यांच्या सहवासाचे विविध संस्कार पचवत होतो. कोजागिरीची गाणी, हरितालिका पूजा, आरत्या, जागर व खेळ, गणेशोत्सव, रंगपंचमी, होळी असे सण व उत्सव यांतून, सहकार्य, एकोपा, जिद्दीने कार्यक्रम बसवून पूर्ण करण्याचे धडे मिळत होते. रामनवमीपासून हनुमान जयंतीपर्यंत होणाऱ्या कीर्तनांचा जागर आजही कानांत घुमतो. आफळेबुवा, कोपरकरबुवा, दातेबुवा, निझामपूरकर बुवा यांची रसाळ व प्रबोधनपर कीर्तने आम्ही बाळगोपाळांनी, शेजारच्या काकू - मावशांच्या साथीसंगतीत ऐकली. पुराणांतीलच नव्हे तर स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारकांचा गौरवशाली इतिहास त्यांतून ठाऊक झाला. आधुनिक वैज्ञानिक संदेश देत कीर्तने करणारे डॉक्टर 'खरेबुवा' आजही लक्षात आहेत.

अतिशय साध्या पण स्वच्छ व नीटनेटक्या पोषाखातील, कसलाही बडेजाव नसलेले थोर व्यक्तिमत्व म्हणजे श्री. शिवाजीराव भोसले. त्यांचे ओजस्वी व तेजस्वी भाषण गणेशोत्सवात लक्ष्मीनगर, पर्वती-पुणे येथे प्रथम ऐकले. ते त्यांचे शब्द आजही कानांत घुमतात. पुढे त्यांच्या अभ्यासपूर्ण व्याख्यानांचा लाभ सतत मिळत राहिला. स्वा. तात्याराव सावरकरांचे एस्. पी. कॉलेज पटांगणातील भाषण ऐकल्याचे आजहि स्मरते हे माझे महद्‌भाग्यच म्हणावे लागेल! पुण्यात राहिल्याने अशा अनन्यसाधारण व्यक्तिमत्वांचा प्रभाव माझ्यावर कुमारवयातच पडला. 'सवाई गंधर्व 'महोत्सवाच्या संगीतातील दिग्गजांच्या सुमधुर गायनाचा रसास्वाद, बाबूजी उर्फ सुधीर फडके यांचे गीतरामायण कानांचे पारणे फेडण्यास समर्थ होते. हे सर्व सांगण्याचा उद्देश साहित्य, संगीत, कला यांची प्राथमिक ओळख होऊन माझे व्यक्तिमत्व विकसित होण्यास पोषक वातावरण मिळाले. कला म्हणजे कलावंताबरोबरच रसिकालाही उन्नत करते हे खरेच.

माझे बालपणातील शेजारी प्रख्यात चित्रकार अण्णा नार्वेकर-एक प्रसन्न व्यक्तिमत्व. आमच्याकडून प्रत्येक चित्र पांच पांच वेळा करवून घेणाऱ्या अण्णांच्या प्रत्येक पहिल्या चित्राचा पहिला प्रेक्षक, चित्रकलेचे कसलेहि तांत्रिक ज्ञान नसलेल्या, त्यांच्या पत्नी सौ. अंजली काकू याच असत. त्यांचे त्या चित्राविषयीचे मत त्यांना मोलाचे वाटे. या गोष्टीचे आम्हाला तेव्हा राहून राहून

**(पुढील मजकूर पृ. २३ वर)**

## या अंकात


| अनु.विषय | लेखक | पृ. |
|---|---|---|
| १. संपादकीय भूमिका | डॉ. सुमेधा प्र.मराठे, वडाळा | १,७ |
| २. स्वा.सावरकर- एक आठवण | डॉ.शरच्चंद्र दत्तात्रेय मराठे,पुणे | १,६ |
| ३. मी कलासाधक | श्रीम. कुमुद सु.(मराठे-)डोके, ठाणे | २,२३ |
| ४. या अंकात (अनुक्रमणिका) | सहसंपादक | ३ |
| ५. प्रतिष्ठान वृत्त | संपादिका | ३ |
| ६. मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००९ | सौ.नीलांबरी मराठे, पुणे | ४ |
| ७. कै. मामी मराठे -प्रथम स्मृतिदिन | डॉ. सुमेधा प्र.मराठे, वडाळा | ४ |
| ८. सभासद वृत्त | सहसंपादक | ५ |
| ९. उदात्त रुग्णसेवा .. ? (भाग २) | डॉ.मधुसूदन पु. विद्वांस, दादर | ७,२१-२२ |
| १०. विवाह संस्काराचे महत्त्व | डॉ. सौ. हंसश्री स.मराठे, नागपूर | ८,२० |
| ११. शहाणे करून सोडावे! | सौ.राधा मराठे, पुणे | ९ |
| १२. गुणवत्ता पारितोषिके -आवाहन | संपादिका | १० |
| १३. माझी 'संगीत' वाटचाल | श्री. शेखर खांबेटे, मुंबई सेंट्रल | ११,१८ |
| १४. चहाच्या गप्पा : (भाग २ ) | श्री. ह.मो. मराठे, पुणे | १२-१३,१९ |
| १५. ओवाळणी | श्री. विनायक केशव मराठे, वरळी | १४-१६ |
| १६.सदस्य-संवाद | श्री. सी. गो. खांबेटे, सहसंपादक | १६ |
| १७.माहेरच्या अंगणात | सौ. उर्मिला श्रीनिवास मराठे, पुणे | १७-१८ |
| १८.जागतिक पर्यावरण दिन | सौ. अरुणा अरविंद मराठे, पुणे | १९ |
| १९.मनोगत | श्री.जयंत र. मराठे, पुणे | २० |
| २०.शेवटचे पान-शेवटचा संवाद | सहसंपादक | २२ |


### 'छे, आपलं चुकलंच बुवा!'

(हितगुजचे अनुभवकथनपर आत्मनिवेदनात्मक नवीन सदर)

आपण जीवन जगत असताना आयुष्यात आपल्याला विविध अनुभव येत असतात. कांही चांगल्या संधी येत असतात, विशिष्ट परिस्थितीत आपण वेगळे वागतो, मनाविरुद्ध काही निर्णय घ्यावे लागतात, नको असलेल्या प्रसंगात तडजोडी अनेकदा कराव्या लागतात, कोणाची मने जाणता-अजाणता दुखावली जातात, हे असे प्रत्येकाच्या जीवनात घडत असते. पण त्यानंतर घडून गेलेल्या घटना, प्रसंग आज आठवले तर मागे वळून पाहताना असे वाटते- 'छे! आपलं चुकलंच बुवा!, त्यावेळी आपण असे वागायला नको होते.....'

थोडीशी पश्चात्तापाची, उपरतीची भावना उफाळून येते किंवा 'असे वागलो असतो तर.. ?' अशी रुखरुख मनाला टोचत असते. 'जर-तर' च्या हिंदोळ्यावर मन हेलकावत राहते.

तेव्हा अशा प्रसंगांना शब्दबद्ध करा आणि हितगुजकडे प्रसिद्धीसाठी पाठवा. आपल्या लिखाणाचे स्वागत आहे.

-संपादिका.

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करावा म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

मार्च २००८ ते ३१ मे २००८ या तिमाहीत (१) दि. ८-०३-२००८, (२) दि.२६-०४-२००८ व (३)१७-०५-२००८ अशा तीन सभा झाल्या. त्या सभांचा संक्षिप्त अहवाल येणेप्रमाणे:-

पहिली सभा दि. ८ मार्चला प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री.आनंदराव मराठे यांच्या मातोश्रींच्या- ती. मामींच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आयोजित समारंभस्थानी ठाणे येथे झाली. पत्रवाचन व खर्च मंजुरी होऊन सभेतील उपस्थितानी समारंभातील सांगीतिक कार्यक्रमाचा आनंद घेतला. याविषयीचा वृत्तांत अन्यत्र दिला आहे.

दुसरी सभा शनिवार दि. २६ एप्रिल रोजी अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे यांच्या ठाणे निवासस्थानी झाली. हितगुज नियमितपणे वेळेवर प्रसिद्ध व वितरित व्हावा यासाठी प्रयत्न करावेत असा सर्वांनी आग्रह व्यक्त केला. तसेच हितगुजच्या ७५ व्या अंकासाठी जाहिराती मिळविण्यासाठी सर्वांनी नेटाने प्रयत्न करावेत असे ठरले. पुण्याच्या सौ. राधा मराठे यांच्या पत्राची विशेष नोंद घेऊन त्यांचेशी त्वरित संपर्क साधून त्याना यथोचित उत्तर पाठवावे असे ठरले.

मराठे प्रतिष्ठानच्या वास्तु प्रकल्पासाठीच्या अनामत ठेव योजनेला पुरेसा प्रतिसाद नसल्यामुळे ती योजना रद्द करण्यात आल्याचा निर्णय सर्वसंमतीने घेण्यात आला.

तिसरी सभा शनिवार दि. १७ मे ला श्री. ल.शं.मराठे यांचे मुलुंड निवासस्थानी झाली. प्रतिष्ठानच्या भावी योजना, हितगुजसंबंधी चर्चा, आगामी हितगुज-७५ या विशेषांकासाठी श्री. भाऊ मराठे यांचे गेस्ट एडिटर म्हणून सहाय्य घेण्याविषयी अशा बऱ्याच गोष्टींवर विचारविनिमय झाला. हितगुज साठी जाहिराती मिळविण्यासाठी जोराचे प्रयत्न सर्वांनीच करावेत यावर भर देण्यात आला.

कार्यवाह श्री मोहनराव मराठे यांनी वास्तुप्रकल्प अनामतीची त्यांची रु. १०००० ची रक्कम प्रतिष्ठानला देणगी म्हणून दिल्याचे जाहीर केले. (त्यांचे या विषयीचे पत्र पृ.१० वर पहावे).धन्यवाद.

रुचिपूर्ण कोकणी मेव्यासहच्या अल्पोपाहाराने बैठकीची सांगता झाली. पुढील बैठक श्री. अरविंदराव मराठे यांचे डोंबिवली निवासस्थानी शनिवार दि. १४ जून रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले.

-०-



## मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००९

**१०० रुपयात आपले नांव छापलेली डायरी मिळवा.**

**सौ.नीलांबरी मराठे, पुणे शाखा.**

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेने २००६ सालापासून डायरी काढून सुरुवात केली व हा उपक्रम यशस्वीपणे राबविला आहे.

आता २००९ सालची डायरी काढण्याचा निश्चय पक्का केला आहे. या डायरीमध्ये प्रत्येक दिवसासाठी (शनिवार व रविवार सहित) पूर्ण पान असेल. पृष्ठदानाची कल्पनाही राबवली जाईल. ही डायरी ४०० पानांची असून त्यातील ३६५ पाने पृष्ठदानाची असतील. ३५ पानांमध्ये विविध विषयांवरील उपयुक्त माहिती व जाहिराती असतील. अनेक कुलबांधवांच्या सूचनेनुसार डायरीला प्लॅस्टिक कव्हर केलेले असेल.

**पृष्ठदानासाठी १०० रु.** निश्चित केले आहेत. आपल्या स्वतःचा, मुलांचा, बायको, बहीण, भाऊ, आई, वडील यांचे वाढदिवस किंवा कोणाच्या स्मृतिप्रीत्यर्थ तारखा कळवून आपण पृष्ठदान करू शकाल. गेल्या वर्षीच्या डायरीत पृष्ठदान केलेले असेल त्यांनी यंदाही पुन्हा करण्यास काहीच हरकत नाही. लवकरात लवकर आपण पृष्ठदानाच्या तारखा कळवल्या म्हणजे त्याच दिवशीच्या पानावर घालता येतील. **याशिवाय आपल्या इच्छेनुसार आपण आपला ई-मेल कळविल्यास त्याचाही छापावयाच्या माहितीत समावेश करता येईल** तरी आपली माहिती कळवून जास्तीत जास्त पृष्ठदानासाठी नोंदणी करावी.

डायरीमध्ये जाहिरात छापण्यासाठीचे दर खालीलप्रमाणेः-

*१.डायरीचे मलपृष्ठ रंगीत ७००० रु.*
*२.मलपृष्ठाचे आतील पान रंगीत ६००० रु.*
*३.रंगीत पूर्ण पान ५००० रु.*
*४.काळे पांढरे पूर्ण पान ३००० रु.*
*५.काळे पांढरे अर्धे पान १५०० रु.*
*६.काळे पांढरे पाव पान ५०० रु.*
*७.शुभेच्छा पट्टी ३०० रु. व पृष्ठदान १०० रु.*

बाहेरगांवच्या लोकांनी पृष्ठदान किंवा जाहिरातीचे पैसे पाठवताना शक्यतो ड्राफ्ट किंवा मनिऑर्डरने पाठवावे. चेकने बँकेत कमीशन खूप कापले जाते असा अनुभव आहे. मनिऑर्डरने पैसे पाठवल्यास आमच्याकडे जो भाग राहतो त्यावरही आपले पूर्ण नाव, पत्ता, रक्कम व तपशील लिहावा म्हणजे नोंदणी करणे सुलभ होईल.

डायरीच्या सुरुवातीच्या पानांतल्या माहितीत कोणत्या विषयांचा समावेश असावा, त्या विषयाची माहिती कोणाकडे मिळेल याबद्दल आपले विचार आणि आपल्या अन्य काही सूचना असतील तर त्याही कळवाव्या.

गेल्या वर्षी वेळे अभावी सर्व कुलबांधवांशी आम्ही संपर्क साधू शकलो नाही. यावर्षी जास्तीत जास्त कुलबांधवांना डायरीमध्ये सहभागी होता यावे म्हणून हे निवेदन लवकर देत आहोत. तरी **आपण पृष्ठदान, जाहिराती व आवश्यक माहिती पाठवावी** म्हणजे छपाईसाठी पुरेसा वेळ मिळू शकेल. आपल्या ज्या कुलबांधवांकडे हितगुज जात नसेल त्यांनाही आपण वरील माहिती द्यावी अशी नम्र विनंती आहे. लोभ आहेच वृद्धी व्हावी.

**- सौ. नीलांबरी रमेश,** पुणे

**संपर्क व पत्रव्यवहारासाठी पत्ता :-**

**१. सौ. नीलांबरी रमेश मराठे**
व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र, ६४२,नारायण पेठ, प्राथमिक नूमवि समोर, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०.
फोन :२४४५६२७०/ ६५२००६९८(निवास)

**२. श्री. अरुण दत्तात्रय मराठे**
१७५९ सदाशिव पेठ, भिकारदास मारुती जवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३२८१

**३. श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे**
त्रिवेणी नं. १, डेक्कन पाटबंधारे सोसायटी, एस.एन.डी.टी.कॉलेज समोर,सर्व्हे नं.३६/९, एरंडवणे, पुणे४११०३८;
फोन-२५४६४७०६/सेल-९८२२७७७३६१;

*चुकीची दुरुस्ती : हितगुज-७३ (मार्च०८)*

'या अंकात' या अनुक्रमणिकेच्या सदरात क्र.२५ वर 'आठवणीतली ताई' हा श्री. अरविंदराव मराठे यांचा (*मातोश्रींच्या शतसंवत्सरीय जन्मदिवस कौतुक सोहळ्यामध्ये केलेल्या भाषणाचा)* वृत्तांत पृ. २१ वर दिल्याचे छापले आहे. त्याऐवजी तेथे 'english section' असे वाचावे. कारण मूळ लेख श्री अरविंदरावांच्या इच्छेनुसार मागे घेऊन (छपाई प्रक्रिया चालू असता आयत्या वेळी) नवीन 'english section'टाकण्यात आला. मात्र अनवधानाने मूळ लेखाचा शेवटचा काही भाग पृ.२२ वर तसाच राहिला. या 'अक्षम्य'चुकेबद्दल मी व्यक्तिशः दिलगीर आहे. या खुलाशाने संबंधितांचे समाधान व्हावे ही नम्र अपेक्षा आहे.-सी गो खांबेटे

## कै.मामी मराठे यांचा प्रथम स्मृतिदिन

*सुरमयी श्रद्धांजली*

शब्दांकन- डॉ-.सौ. सुमेधा प्र.मराठे

शनिवार दि. ८ मार्च २००८ रोजी दुपारी ४ वा. ठाणे येथील लक्ष्मीकेशव कार्यालयात कै. मामी मराठे यांचा म्हणजे आपले अध्यक्ष आनंदराव यांच्या मातोश्रींचा प्रथम स्मृतिदिन स्वरमय वातावरणात संपन्न झाला. योगायोग म्हणजे, ८ मार्च हा जागतिक महिला दिन. याच दिवशी कै. मामी या समाजोपयोगी कार्याची आवड असणाऱ्या कर्तबगार महिलेचा स्मृतिदिन साजरा झाला.

श्री भाऊ मराठे यांच्या रसपूर्ण निवेदन व सूत्रसंचालनाच्या साथीने सौ. मृदुला दाढे-जोशी या सुस्वर गळ्याच्या गायिकेला अनुरूप स्वराची देणगी असलेल्या श्री. चिंतामणि सोहनी या तरुण गायकाच्या संगतीने मैफल रंगू लागली.

घनःश्याम सुंदरा, या भूपाळीने सुरुवात, नंतर लटपट लटपट तुझं चालणं, मानसीचा चित्रकार तो, आली हासत पहिली रात, रिमझिम पाउस पडे सारखा,लाजून हासणे, चंद्र आहे साक्षिला, अशा एकापेक्षा एक सरस व सुंदर भावगीतांमध्ये रसिक मने रंगून गेली. त्यात जगदीश मयेकर यांची तबला साथ, सिंथेसाइजरवर आनंद सहस्त्रबुद्धे , आणि अजित वैद्य, गौतम नाईक या अन्य उत्तम साथीदारांमुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली. औपचारिक भाषणबाजी नाही, गळा काढून रडणे नाही, दाटल्या कंठाने आठवणींचा उमाळा नाही; तर केवळ संगीत आणि मधुर स्वर यांत रंगलेली अनोखी स्वरमयी श्रद्धांजली मनाला भावली. कै. मामींपर्यंत तर नक्कीच पोहोचली असेल.

गरम सुमधुर मसाला दूध तसेच अल्पोपाहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

**हितगुज ७५ः सप्टेंबर २००८**
**अमृतमहोत्सवी विशेषांक**

**-आवाहन- १**

मराठे परिवारातील लेखक व त्यांचे प्रकाशित साहित्य, शोध निबंध,इ. ची सूची या विशेषांकात देण्याचा विचार आहे त्यासाठी माहिती- लेखकाचे नाव व परिचय ,जन्मतारीख, प्रकाशित पुस्तकांची यादी, पृष्ठसंख्या, किंमत, विषयाचे स्वरूप इ.ची माहिती कळवावी.

**अंतिम दि.३१जुलै-२००८**

# सभासद वृत्त

## मानसन्मान



**१.श्री.श्रीजित अशोक मराठे(पृ.४८)यांस 'म.टा'. सर्वोत्कृष्ट सूत्रधार २००७ हा पुरस्कार**

श्रीजित सध्या काम करतोय 'स्टार माझा' या अग्रगण्य मराठी न्यूज चॅनेलमध्ये. मराठीतलं हे दुसरं न्यूज चॅनेल. त्याला २००७ साठीचा सर्वोत्कृष्ट सूत्रधाराचा रामबंधू महाराष्ट टाईम्स सन्मान पुरस्कार मिळाला. त्याच्यासाठी आणि चॅनेलसाठी ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. त्याच्या 'माझा बाऊन्सर' या टॉक-शो साठी त्याला हा पुरस्कार मिळाला, ज्यात संदीप पाटील हे माजी क्रिकेटपटु वेगवेगळ्या क्रिकेटमधील विषयांबाबत आपल्या एक्सपर्ट कॉमेंट्स करतात, त्यांच्याशी श्रीजित संवाद साधतो, आणि प्रेक्षकही थेट संदीप पाटील यांना प्रश्नांचे बाऊन्सर टाकतात. या आधी दीड वर्ष मुंबईत 'लोच्या झाला रे' आणि 'चल ऐश कर ले' (चिंतामणी प्रोडक्शन) या दोन व्यावसायिक नाटकांमध्ये त्यानी काम केलं आहे. कोकणात, कालवी आणि देवगड या गावी शिक्षण पूर्ण करून, मुंबईत तीन वर्षापूर्वी आलेल्या या नवयुवकाने कठोर परिक्षमाने इतक्या लहान वयात हा बहुमान मिळवला यासाठी मराठे प्रतिष्ठान त्याचे खास अभिनंदन करित आहे. मराठे आडनावाविषयी, घराण्याविषयी प्रचंड अभिमान बाळगणाऱ्या या तरुणाकडून परिवारातील युवकांना स्फूर्ती व प्रेरणा मिळावी ही अपेक्षा आहे.

-०-

**२.कु.कौस्तुभ सुनील पाटणकर** (पृ.३८९ सौ. उषा ताम्हनकर-माहेरची निर्मला गोपाळ मराठे यांचा नातू) ह्याने पदवीनंतर 'I M A'ची कंबाईंड सर्व्हिसेस परीक्षा उत्तीर्ण केली. नंतर जुलै ते डिसेंबर २००६ पर्यंत डेहराडून येथे प्रशिक्षण पूर्ण करून ११व्या शीख रेजिमेंटमध्ये लेफ्टनंट म्हणून रुजू झाला. ह्या परीक्षेसाठी निवृत्त कर्नल प्रमोदन मराठे यांचे मार्गदर्शन लाभले.

**३.कु. ओंकार मोहन गोखले** (पृ.३८९- श्रीम. सुनीता गोखले-माहेरची उषा गोपाळ मराठे यांचा नातू) ह्याने विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन खालील पारितोषिके मिळविली.

१.राज्य नाट्यस्पर्धा सर्वोत्कृष्ट अभिनय.
२.नू.म.वि.आंतरशालेय वक्तृत्वस्पर्धा प्रथम क्र.
३.आंतरशालेय उत्स्फूर्त वक्तृत्वस्पर्धा प्रथम क्र.
४.SSPSN आंतरशालेय वक्तृत्वस्पर्धा प्रथम क्र.
५.आयुका येथील विज्ञानदिनानिमित्त आयत्या वेळचा विषय-निबंधस्पर्धेत द्वितीय क्र.

**४.नारायण(अमित)मराठे,तिस्क - उसगांव याचीगोदरेज कंपनी मध्ये निवड**

तिस्क येथील सेवानिवृत्त शिक्षक श्री. गो. ना. मराठे (पृ.५४१) यांचा पुत्र चि. अमित याचा दिल्लीच्या आय आय टी येथील मास्टर ऑफ डिझाईन या कोर्सच्या अंतर्गत ट्रेनिंगसाठी मुंबईच्या गोदरेज कंपनीत निवड झाली आहे.. या निवडीबद्दल चि. अमितचे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन!

मराठे प्रतिष्ठानतर्फे या यशस्वी युवकांचे हार्दिक अभिनंदन

**५.कालिदास बा.मराठे(पृ.५४१) निवृत्त शिक्षण संचालक, गोवा यांचे चौथे पुस्तक प्रकाशित**

श्री कालिदास मराठे यांच्या 'शालेय पातळीवर गुणवत्तेचे मानांकन आणि श्रेणीकरण' या अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर यानी प्रकाशित केलेल्या चवथ्या पुस्तकाचे दिनांक ११-मार्च २००८ रोजी शानदार प्रकाशन झाले. त्यांची यापूर्वीची पुस्तके- १. प्रौढ शिक्षण, छे! छे! युवाशिक्षण, २. अशी वाढवूया शैक्षणिक गुणवत्ता आणि ३.माझा शिक्षणनामा यांचे शिक्षण क्षेत्रामध्ये चांगले स्वागत झाले. श्री. कालिदास मराठे यांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे विशेष अभिनंदन.

**हितगुज ७५: सप्टेंबर २००८**
**अमृतमहोत्सवी विशेषांक**
**-आवाहन- २**

अंदाजे ७५ पृष्ठांच्या या विशेषांकासाठी आपल्या निवडक साहित्याची अपेक्षा आहे. कथा, कविता, प्रवासवर्णन, लेख, अनुभवकथन, आठवणी, बालसाहित्य, विनोद, चारोळ्या, व्यंगचित्रे इ. विविध प्रकारचे साहित्य पाठवावे .

सोबत आपला फोटो, टेलिफोन, पूर्ण पत्ता, ई-मेल इ. अवश्य पाठवावे.

**अंतिम तारिख १५ जुलै २००८**

## नांदा सौख्यभरे

**१.** विलेपार्ले-मुंबई येथील सदस्य श्री. वसंत रामकृष्ण मराठे (पृ.९०) यांची कन्या **चि.राधिका** हिचा शुभ विवाह श्री. श्रीकृष्ण रा. रोपलेकर, यांचा पुत्र **चि.प्रणव** याचे बरोबर **२८ एप्रिल २००८** रोजी राजपुरिया बाग, विलेपार्ले येथे संपन्न झाला.

२. नागपूर येथील सदस्य श्री.दत्तात्रेय कृष्णाजी मराठे (पृ.३३४) यांचा पुत्र **चि. आशिष** याचा शुभ विवाह श्री. प्रमोद मुळे, यांची कन्या **चि.पूनम** हिचे बरोबर **९ मार्च २००८** रोजी टाटा हॉल, चेंबूर येथे संपन्न झाला.

वरील सर्व नवविवाहिताना प्रतिष्ठानच्या शुभेच्छा.

## सहवेदना

**१.** प्रतिष्ठानचे विश्वस्त-श्री.अरविंद दामोदर मराठे (पृ.२९२) यांच्या शतायुषी मातोश्री **श्रीमती सत्यभामा(ताई) वय १००,** यांना **दि.३१ मार्च २००८** रोजी वृद्धापकाळामुळे देवाज्ञा झाली. त्यांच्या मागे तीन पुत्र -सुना, मुलं-जावई , नातवंडे-पंतवंडे असा मोठा परिवार आहे. अलिकडेच त्यांचा शतसंवत्सरीय वाढदिवस सोहळा त्यांच्या नातवंडांनी मोठ्या दिमाखाने साजरा केला होता. त्याचे वृत्त मागील हितगुज मार्च २००८ मध्ये पृ.२३ वर आले आहे.

**२.** डोंबिवली येथील सदस्य श्री. श्रीपाद यशवंत मराठे (पृ.८७) यांच्या मातोश्री **श्रीमती प्रमिला,** वय ७७, यांचे दि. ८-३-२००८च्या सुमारास वृद्धापकाळामुळे निधन झाले.

वरील दिवंगतांच्या परिवाराच्या दु:खात समस्त मराठे परिवार सहभागी आहे.

**हितगुज ७५: सप्टेंबर २००८**
***अमृतमहोत्सव विशेषांक***
**-आवाहन-३:** जाहिरातींचे दर
**१**.रंगीत कव्हर-आतली बाजू-रु. ३०००
**२**.पूर्णपान-रु.२५००; **३**.अर्धपान-रु.१५००
**४**.पाव पान-रु.८००; **५**.१/८पान रु.५००
**६**.सदिच्छा /पृष्ठदानासाठी पूर्ण नांव,संक्षिप्त पत्ता, फोन नं. ई-मेलसह तीन ओळींची पट्टी रु.३००

*एका वर्षात वरील कोणतीही जाहिरात सलग*
***दोनदा दिल्यास तिसरी साठी अर्धा दर)***

*(स्वा. सावरकर -पृ. १ वरून )*

त्यांच्या अनुमतीशिवाय जाणे अशक्यच. त्यांच्या सेवेसाठी एक नर्स सतत असे. त्यांच्या खोलीत परवानगीशिवाय फक्त सौ. प्रभाताताई व तात्यारावांच्या दोघी नाती जाऊ शकत. आम्ही सौ. प्रभातताईंना साकडं घातलं आणि त्यांनी तात्यारावांची संमती मिळवली. आम्ही सर्व तात्यारावांच्या खोलीत गेलो. माझ्याशिवाय बाकीचे सर्वजण तात्यारावांना आधी बरेचदा भेटले होते. मी प्रथमच त्यांचे दर्शन घेत होतो. कॉटवर तात्याराव शांतपणे डोळे मिटून पहुडले होते. सौ. प्रभातताईने आम्ही सर्व भेटायला आल्याचे सांगितले. तात्यांनी खुणेने "कोण" असं विचारलं. त्यावर सौ. प्रभातताई सांगू लागल्या "हे सुभाष पुरंदरे", तात्यांनी मान डोलावली. प्रभातताई पुढे क्रमाक्रमाने प्रत्येकाची ओळख सांगू लागल्या आणि तात्याराव ओळख पटल्याचे मान डोलवून दाखवीत होते. शेवटी सौ. प्रभातताईंनी माझी ओळख सांगितली "हे शरद मराठे". त्यावर तात्यारावांनी खुणेने "कोण" म्हणून विचारले. सौ. प्रभातताई म्हणाल्या "आपल्या पलिकडेच इंजिनियर मराठे व सौ. शांताबाई मराठे राहतात नां, त्यांचे हे चिरंजीव." एवढे त्या म्हणाल्या नाहीत तोवर तात्यारावांनी क्षणभर फटकन् डोळे उघडून माझ्याकडे पाहिले आणि नंतर डोळे मिटून घेऊन मान डोलावली. ही आणि अशी माझी नि तात्यारावांची पहिली भेट. ती एकच निमिषासाठी दृष्टिभेट झाली पण त्यांच्या डोळ्यांतील असामान्य तेजाने माझे डोळे दिपले. आतापर्यंत कथाकादंबऱ्यातूनच फक्त डोळ्यांचे तेज वगैरे वाचले होते. आणि ते सर्व कपोलकल्पित असल्याचे वाटत होते. पण आज पूर्णपणे भ्रमनिरास झाला. पाणीदार डोळे आणि धारदार नजर म्हणजे काय ते समजले.

आम्ही सर्वजण तात्यारावांच्या सेवेत दररोज सुन्न होत होतो. त्यांच्या घरांतील व येणाऱ्या दर्शनार्थींची ओळख होत होती. परंतु तात्यारावांच्या अनुमतीशिवाय त्यांच्या खोलीत प्रवेश नव्हता. तात्यारावांच्या प्रखर निग्रहापुढे आम्ही सर्व हतबल झालो होतो आणि केवळ तात्यारावांकडे पहात बसण्यापलिकडे आम्ही काही करु शकत नव्हतो. असेच आम्ही खाली बागेत बसलो असतां, एकदा श्री. गोपाळराव गोडसे आणि श्री. विष्णुपंत करकरे म्हणाले, "डॉक्टर, तात्यारावांनी अन्नपाणी वर्ज्य करून जवळ जवळ तीन आठवडे झाले. तुमच्या शास्त्राप्रमाणे किती दिवस मनुष्य अन्नपाण्याविना राहून शकतो ?" मी म्हणालो "आठ-दहा दिवसांपेक्षां जास्त राहूं शकत नाही." पण तुम्ही विचारतां त्याप्रमाणे तात्यारावांच्या बद्दल शास्त्रानुरूप काहीच सांगता येत नाही. माझ्याकडे शास्त्रीय उत्तर नाही." त्यावर ते म्हणाले, "मी सांगतो. तात्यारावांनी कुंडलिनी जागृत केली आहे आणि त्यावर हे सगळं चाललं आहे. अंदमानात त्यांनी सर्व योगशास्त्र आत्मसात केलं आहे." ह्यानंतर एक-दोन दिवसांत दिल्लीहून भारत शेजाऱ्याबरोबरचे युद्ध जिंकल्याची खास बातमी तात्यारावांसाठी मा.संरक्षणमंत्री-यशवंतराव चव्हाणांकडून आली. तात्यारावांच्या तत्वांचाच हा एका अर्थी जय होता.

दि. २६ फेब्रुवारी १९६६, हा दिवस मी माझ्या आयुष्यांत कधी विसरणं शक्यच नाही. त्या दिवशी साधारण ९।।-१० चे सुमारास श्री. आप्पा कासार माझ्याकडे धावतच आले आणि म्हणाले, "डॉक्टर, जसे असाल तसे तात्यांकडे चला." मी हातातलं काम तसंच टाकून तात्काळ गाडीतून सावरकर सदनाकडे त्वरेने निघालो. वस्तुतः ५-६ घरांचं अंतर, पण तरीही दिरंगाई होऊ नये म्हणून गाडी. कां कुणास ठाऊक, पण कुठल्यातरी आंतरिक आवाजाने मी माझे अँबू रिससिटेटर (AMBU Ressetator-कृत्रिम श्वासोच्छ्वासाचे पोर्टेबल यंत्र) तात्यारावांच्या खोलीत ठेऊन दिले होते. तात्यारावांच्या खोलीत जाऊन बघतो तर सर्व डॉक्टर सहकारी व घरची मंडळी खोलीत जमा होती. डॉ. अरविंद गोडबोले तात्यांची नाडी धरून सचिंत उभे होते. सर्व उपस्थितांचे चेहरे हतबल आणि करुणामय. कोणीही एक शब्दसुद्धा बोलत नव्हतं. मी सहकाऱ्यांकडे बघितलं. नजरेनंच जाणलं की आता काही खरं नाही. मी माझा अँबू रिससीटेटर काढला आणि तात्यारावांच्या तोंडावर ठेवण्यासाठी तयार ठेवला. अंदाजे १०-५५ ते ११ वाजले असतील. तात्यारावांची जबड्याखालची शीर स्पंदन करायची अचानक थांबली आणि मी वर पहात निराशेने उद्गारलो, "ही इज नो मोअर." डॉ. अरविंद गोडबोलेंनी छातीवर स्टेथोस्कोप ठेऊन पुनः पुनः खात्री केली. तोपर्यंत विश्वासराव आणि सौ. प्रभातताई यांच्या बापुडवाण्या चेहऱ्यांकडे बघवत नव्हतं. त्यांचे वडिल गेले होते. हे अटल होणार हे माहित होते. धीराने मनाची तयारीही झालेली होती. पण वेडी माया, अशी थोडीच तुटते. त्यांची मौन नजर विनवीत होती, "पहा ना जरा, डॉक्टर माझ्या वडिलांना वाचवा." हे सगळं काही क्षणात आणि मुक्यानेच मलाही काय झालं कुणास ठाऊक. त्याक्षणी माझे पेशंट स्वातंत्र्यवीर नव्हते, तर विश्वासराव आणि सौ. प्रभातताईंचे प्रिय वडील. मी म्हणालो, "फक्त एकदांच प्रयत्न करून पाहू." आणि मी तात्यारावांना कृत्रिम श्वासोच्छ्वास देऊ लागलो. मिनिट-दो मिनिटांत तात्याराव पुनश्च स्वतःहून श्वासोच्छ्वास घेऊ लागले आणि कार्डियोपल्मोनरी रिससीटेशन पूर्णपणे यशस्वी झालं होतं. तात्यारावांनी डोळे उघडले, सगळ्यांकडे स्मित हास्य करीत डोळे भरून पाहिलं आणि ११-४० वाजतां शांतपणे डोळे मिटले-पुनः न उघडण्यासाठी. त्या क्षणी मला भान आलं की काय असामान्य गोष्ट ह्या लोकोत्तर पुरुषाच्या संबंधात माझ्या हातून झाली. किंबहुना त्यावेळी मी माझा पेशंट हा अलौकीक व्यक्ति आहे हे विसरून, त्यावेळी केवळ डॉक्टर - पेशंट असं नेहमीच कुठलंही दबावरहीत आणि आपल्या पेशंटचे प्राण आपण सर्व कौशल्यानं आणि शर्थीनं वाचवायचेच या जिद्दीनेच, माझ्या हातून ती अविस्मरणीय घटना घडली.

-०-

### 'भूलशास्त्र' म्हणजे नेमके काय असते हो, डॉक्टर?

शस्त्रक्रिया करतांना रुग्णाला अजिबात दुखू नये, समजू नये म्हणून भूल दिली जाते. पण हे भूल देण्याचे शास्त्र एकदम स्वतंत्र आहे ही माहिती बहुतांशी लोकांना नाही. खरं तर या प्रगत शास्त्राला अद्याप मराठींत चपखल शब्द नाही. 'Anaesthesiology' [Ana -नाही, esthesia- स्पर्श, logy - शास्त्र. म्हणजे स्पर्श न जाणवू देण्याचे शास्त्र ] असे या शास्त्राला म्हणतात. याला मराठीत प्रचलित पर्यायी शब्द भूलशास्त्र, बधिरीकरणशास्त्र असे आहेत. परंतु हे पर्याय या नवीन प्रगतशील शास्त्राचा पूर्णतः समावेश करू शकत नाही. तसं पाहिले तर हे शास्त्र गेल्या शे-दीडशे वर्षात झपाट्याने विकसित झाले आहे. इतके की त्यामुळेच हृदयारोपण, मूत्रपिंडरोपण वगैरे सारख्या शस्त्रक्रिया विकसित होऊ शकल्या.

-डॉ.शरच्चंद्र मराठे



*(संपादकीय भूमिका-पृ. १ वरून )*

सांगायला आनंद वाटतो की आपल्या कुलभगिनी 'माहेरच्या अंगणात' या सदरासाठी लेखन करायला हिरीरीने पुढे सरसावल्या आहेत. त्यामुळे लेखांची निवड करतेवेळी काही लेख मागे ठेवावे लागतात. मात्र त्यामुळे कोणीही नाराज होऊ नये. व आपले लेख अवश्य पाठवावेत. जरूर पडल्यास एखादा विशेषांक काढून आपल्या लेखनाची योग्य दखल घेण्यात येईल याबद्दल विश्वास बाळगावा. काही वेळा नवीन लेखक-लेखिकांना वाव देताना नेहमी लिहिणाऱ्यांना थोडे थांबावे लागले तरी गैरसमज नसावा.

महत्त्वाची गोष्ट अशी की सप्टेंबर २००८ म्हणजे पुढचाच अंक ७५ वा म्हणून अमृतमहोत्सवी विशेषांक काढणार असल्याचे व त्यासाठी साहित्य पाठविण्यासाठी आपणास मागील अंकात आवाहन केले आहेच. ('आवाहन-१' व 'आवाहन-२' याच अंकात पृ.४ व ५ वर पहावे.) कुलबांधवांच्या शुभेच्छा जाहिराती, व्यावसायिक जाहिराती तसेच अन्य जाहिरातींसाठी सर्व सदस्यांनी सहकार्य करावे ही विनंती. याबद्दल तपशील 'आवाहन-३' पृ.४ वर.

हितगुज आपले सर्वांचे आहे. त्याला बळ देणे आपले कर्तव्य आहे. आपणापैकी प्रत्येक १८ वर्षावरील तरुण व्यक्तीने प्रतिष्ठानचे किमान १०० रुपये भरून सामान्य सभासद व्हावे व प्रत्येक वेगळ्या पत्त्यावर राहणाऱ्या परिवार प्रमुख व्यक्तीने आजीव सदस्य व हितगुजचे तहहयात वर्गणीदार मिळून एकूण ३०० रुपये शुल्क त्वरित पाठवून द्यावे. दुर्दैवाने तहहयात वर्गणीदार मृत्त झाल्यास अथवा पत्ता बदलल्यास कित्येक वर्षांनी आम्हाला पोष्टाच्या "Addressee expired / shifted :Returned to sender"अशा शेऱ्यासह अंक परत येतो व तो पाठविणे आम्ही थांबवतो. अशा रितीने त्या परिवाराचा संपर्क तुटतो याचे आम्हाला खरोखर दुःख होते. वरील सर्व गोष्टी लक्षात घेऊन आपण आपल्या भावंडांपैकी ज्यांचेकडे हितगुज येत नाही त्यांचे पत्ते आम्हाला कळवावे म्हणजे आम्ही त्यांचेशी संपर्क साधू. हाच नियम माहेरवाशिणीनाही लागू आहे. कित्येक वेळा असे होते की मुलीचे लग्न होते तेव्हा तिला आजीव वर्गणीदार केल्यास आपले हितगुज तिच्या सासरी कायम जात राहील व तिला आपल्या माहेरची कायमची आठवण जपण्याचे सुख आपण तिला सहजपणे मिळवून देऊ शकता. पहा, विचार करा.

*संपादिका- डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे*



डॉ. मधुसदन विद्वांस

# फॅमिली डॉक्टर (वैद्यकीय व्यवसाय)

उदात्त रुग्णसेवा की आपमतलबी धंदा ? भाग २ :मागील अंक ७३ वरून पुढे क्रमशः

डॉ.मधुसूदन पु. विद्वांस, (पृ. ६५३)सहजीवन सोसायटी, गोखले रोड,दादर-प. मुंबई ४०००२८;
दूरध्वनी : (०२०) २४२२१३०८

*(गेली ५० वर्षे दादर येथे व्यवसायात असलेल्या डॉ. विद्वांस यांची लेखमाला १ जानेवारी २००८पासून दैनिक लोकसत्ता (मुंबई वृत्तांत)मध्ये दर मंगळवारी ४ सुमारे एक वर्षासाठी प्रसिद्ध होत आहे. त्यातील निवडक लेख हितगुजमध्ये क्रमशः वाचा.सहसंपादक)*

## (५)टक्केवारीची कीड-२

आमच्या व्यवसायास टक्केवारी कीड १९४५ च्या नंतर लागली. माझ्या ५२ वर्षांच्या व्यावसायिक प्रवासात मला मोजून दोनदा त्याचा अनुभव आला. पहिला अनुभव एका ज्येष्ठ कान, नाक, घसा तज्ज्ञाने दिला. मी नुकतीच व्यवसायास सुरुवात केली होती. माझ्या ओळखीचे आदरणीय डॉ. एस. जी. जोशी निर्वतले होते. एका प्रथितयश ज्येष्ठ कान, नाक, घसा तज्ज्ञांची ओळख झाली होती. मी त्यांच्याकडे चार-पाचदा रुग्णांना घेऊन गेलो. काही दिवसांनी माझ्या ओळखीचे जयवंतकाका मला म्हणाले,

"मधू, तो असे म्हणत होता की, हा तरुण मुलगा माझ्याकडे काम जाणतो म्हणून मला त्याला काहीतरी द्यायचे आहे. पण मी त्याला सांगितले की, तू असे काही करू नकोस. मी मधूला चांगला ओळखतो. तो वयाने लहान असला तरी तो चपराक लगावेल."

"जयवंतकाका, फार योग्य काम केलेत. मी खात्रीने तसाच वागलो असतो." मी म्हणालो.

एका रुग्णाकरिता भेटीची वेळ अगोदरच ठरलेली असल्याने पुढल्याच आठवड्यात मी त्या ज्येष्ठ तज्ज्ञाकडे गेलो होतो. त्या रुग्णाच्या कानावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. मी खर्चाचा अंदाज विचारला. त्यांनी रुग्णास ऐकू जाणार नाही अशा स्वरात मला सांगितले,

"शून्य ते तीन हजार.. तू काय ते ठरव."

मी समजलो की, हा मला घूस देण्याचा प्रकार आहे. मी रुग्णाकडून तीन हजार घेऊन तज्ज्ञाला काहीही दिले नसते तरी चालणार होते. हे केवढे मोठे प्रलोभन होते!

"विचार करतो" असे म्हणून मी सटकलो व तसाच थेट डॉ. पी. पी. कर्णिकांकडे गेलो. त्यांनी नुकतीच व्यवसायास सुरुवात केलेली होती. माझी कॉलेजपासूनची ओळख होतीच. त्यांनी ४०० रुपयांचा अंदाज दिला.

"करून टाका." मी तात्काळ उत्तरलो.

'शून्य ते तीन हजार'वाल्याने माझ्या दवाखान्यात तीनदा चकरा मारल्या. पण मी बधलो नाही. असे प्रलोभनाला बळी न पडण्याला एक प्रकारची मानसिकता असावी लागते. तुमची जडणघडण कशी झालेली आहे, तुमच्या आई वडिलांनी तुमच्यावर काय संस्कार केलेले आहेत हे महत्त्वाचे असते. तुमच्या घरातले आचारविचार याचा पगडा तुमच्या मनावर असतो. विचार करा व्यवसायाच्या सुरुवातीस तीन हजार ही केवढी मोठी रक्कम होती. मी कर्जात होतो. मी दवाखान्याची जागा घेताना ५४०० रुपये मोजले होते. एका फटक्यात ६० टक्के कर्ज फिटले असते. परंतु तसा विचार माझ्या मनाला शिवलाही नाही. मी जर त्या प्रलोभनास बळी पडलो असतो तर कायमचा त्यात अडकलो असतो. मग त्यातून बाहेर पडणे कठीण गेले असते. आणि समजा बाहेर पडलो असतो तरी जीवनाला लागलेला कलंक कधीच पुसता आला नसता. आज ५२ वर्षे व्यवसाय केल्यानंतरही मी ताठ मानेने चालू शकतो. दुखण्यामुळे कंबरेत वाकलो असेन. पण मान ताठ आहे. या बाबतीत माझ्या शत्रूलाही माझ्याबद्दल वावगे बोलता येणार नाही. असे ऐकावयास मिळते की एक कॉरोनरी आर्टरी डिसीझची केस विशिष्ट सर्जनकडे पाठविल्यास रु. २०,००० चा मलिदा त्वरित मिळतो. सोन्याचा मुलामा हा की ही कमाई दोन नंबरची. त्यामुळे करविरहित. ही एक समस्या असते. एवढे पैसे ठेवायचे कुठे? वैद्यकीय व्यवसायाला या कर्करोगाने जाम ग्रासले आहे आणि त्यातून हा व्यवसाय तावून सुलाखून बाहेर पडेल असे वाटत नाही. उलट दिवसेंदिवस सुधारणाच होत जाणार. या सर्व प्रकारात नाहक पेशंटचा औषधोपचारांचा खर्च वाढतो.

## (६)
## व्यवसायाला लागलेली टक्केवारीची कीड

१९५५ साल होते. मी नुकतीच व्यवसायाला सुरुवात केलेली होती. मला पाच-सहा वर्षाने ज्येष्ठ, कॉलेजमधला ओळखीचा एक डॉक्टर भेटावयास आला. "विद्वांस, मी अमुक ठिकाणी प्रॅक्टिस करतो तर माझ्याकडे काम पाठव."

*(पुढील मजकूर पृ. २१ वर)*

# विवाह संस्काराचे महत्व

- डॉ. सौ. हंसश्री सतीश मराठे (पृ.२३६) १८९, पुरुषोत्तम पांडे लेआउट, खामला नागपूर दूरध्वनी: ०७१२-२२८८४७१

*(लवकरच लग्नांचा मोसम संपेल व विवाहविधीचे उपचार विस्मृतीच्या पडद्या आड जातील. एरव्हीसुद्धा प्रत्यक्ष विवाहाचे वेळी स्टेजवरच्या दोन-चार व्यक्ती व पुरोहित(भटजी) यांचेशिवाय कोणीही या विधींकडे आस्थेने पहात नाही. कारण त्यामध्ये रुची दाखविणे मागासलेपणाचे समजण्याची फॅशन प्रचलित आहे. डॉ. हंसश्री यानी या विधींकडे डोळसपणे पाहणे व ते समजून घेणे अगत्याचे आहे तसेच चातुवर्ण्य व आश्रम व्यवस्था यांचे ही एकेकाळी किती महत्त्व होते त्याचे अभ्यासपूर्ण विवेचन या लेखात केले आहे. कधी कधी असे माहितीचे डोस घेणे हे संस्कृती संरक्षणासाठी आवश्यक आहे हे वाचक-सदस्यांनी अवश्य समजून घ्यावे -सहसंपादक सी.गो. खांबेटे)*

कुणा विचारवंताने विवाह विधीचे वर्णन करताना लिहिले आहे,"संस्कारहीन विवाह हा भोगप्रवणतेचा परवाना होय. याउलट संस्कारजन्य सोहळा हा कर्तव्यदक्षतेचा पहिला धडा होय." संस्कार आणि समारंभ यात फरक आहे. संस्कार आवश्यक आहेत. समारंभ ऐच्छिक आहे. संस्कार विधीच्या निमित्ताने समारंभ आहे. समारंभासाठी संस्कार नाहीत.

प्रत्येक संस्काराचा विधी असतो. कारण केवळ उक्तीला नव्हे, कृतीला अधिक महत्त्व असते. साधी गोष्ट बघा, आपण जसा वेष परिधान करतो त्याप्रमाणे मनावर त्याचे पडसाद उठतात.(म्हणून वधू-वेषाचे, वराच्या पोषाखाचे विशेष महत्व!)

विवाह ही बाब पूर्णपणे वैयक्तिक असतांना त्याचे अवडंबर कां माजवावयाचे? असा एक मतप्रवाह हल्ली आढळतो. अवडंबराच्या बाजूने विचार करू जाता तो पटतो देखील. परंतु विवाह ही बाब जरी दोन व्यक्तींमधील असली तरी ती पूर्णपणे वैयक्तिक ठरू शकत नाही. यासंबंधी विचार करता संस्कार आणि धर्म याविषयी मनात आलेले विचार येथे मी प्रगट करीत आहे. ते प्रत्येकाला मान्य असणे अर्थातच बंधनकारक नाही. तर......

आजकालची पिढी संवेदनाशून्य, अलिप्ततावादी, कोरडी होत चालली आहे, असे अनेक ठिकाणी ऐकायला मिळते वंदनीय मावशी केळकर यांचे रसाळ रामायण-प्रवचन ऐकण्याचा एकदा योग आला. त्यावेळी त्यांनी नमूद केलेला एक मुद्दा एकदम पटला आणि म्हणून कायमचा स्मरणात राहिला. या संदर्भात तोच मुद्दा त्यांच्याच शब्दात नमूद करावासा वाटतो. "आजकाल मुलांच्या मनांच्या पाट्या कोऱ्या असतात. याचे कारण घराच्या भिंती कोऱ्या असतात. आमच्या लहानपणी भिंतींवर देवादिकांचे, संतांचे, थोर नेत्यांचे, घरातील जुन्या पिढीतील कर्तबगार लोकांचे फोटो लावलेले असत. बघायला, बोलायला लागल्यापासून नव्हे तर ऐकू येते तेव्हापासून त्या सर्वांची ओळख बालमनाला होत असे." 'हे कोण? ते कोण?' या चौकस प्रश्नांना दिलेल्या उत्तरातून बालमनावर आदर्श व्यक्तिमत्वांचे संस्कार नकळत होत असत. प्रत्यक्ष व्यवहारात सहभागी होण्यापूर्वीचे हे दृढमूल संस्कार त्याच्या हातून अनुचित कृती करण्यास क्वचितच कारणीभूत ठरत."

नवजात बालकाशी आपण पहिल्या दिवसापासून बोलतो. कारण त्याची शारीरिक वाढ ही तर नैसर्गिक बाब आहे. मात्र मानसिक / बौद्धिक विकास हा अवती भवती बोलणारी माणसे असतील तर लवकर होतो हा आपला अनुभव आहे. ज्या घरात तान्ह्या मुलांशी कुणी बोलत नाही त्या मुलांना लवकर समज येत नाही. तात्पर्य कोणत्याही अवस्थेतील असेना कां पण विधी (मग तो कोणत्याही स्वरुपाचा असो) जरी देहाने करावयाचे असले तरी ते मनावरील संस्कारांसाठी असतात. संस्कार ही मनावर परिणाम करणारी गोष्ट आहे. मन किती चंचल असते, त्याला आवरणे किती कठीण आहे हे प्रत्येकाच्या अनुभवाचे समान सूत्र आहे. अशा चंचल मनावर जेव्हा अत्युच्च संस्कार करु तेव्हा ते काही अंशी फलित होतात. सामान्यतः मानवी जीवनात संस्काराचे हे स्थान आहे.

आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणावर धर्म शास्त्राने वेगवेगळा संस्कार सांगितला आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या काळात चार पुरुषार्थांच्या रूपाने जशी चार जीवितसाध्ये सांगितली आहेत त्याचप्रमाणे या चार आश्रमांच्या निमित्ताने जीवनाच्या कुठल्या टप्प्यात कोणता पुरुषार्थ साधावा हेदेखील निश्चित केले आहे.

पहिला ब्रह्मचर्याश्रम! यात धर्म म्हणजे आपल्या शक्ती आणि मतीला अनुसरून आपले कर्तव्य काय हे जाणणे. माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजजीवनाचा तो घटक असतो, हे त्याने विसरता कामा नये. त्यानुसार तो समाजाचे कोणते ना कोणते देणे लागतो. माणसाने समाजाला देता येतील अशा गोष्टी चारच (१) विद्या (२) संरक्षण (३) आर्थिक प्रगती आणि (४) सेवा. यांना वर्ण म्हणतात.

शैक्षणिक जबाबदारी पेलण्यासाठी अध्ययन-अध्यापनाचे कार्य करणारा ब्राह्मण वर्ग. 'जन्मना जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते', असे वेदवचन आहे. म्हणजे जन्माने सर्व एकाच पातळीवर असतात. कर्माने त्यांना वर्ण प्राप्त होतो. संरक्षणाची जबाबदारी पेलण्याचे कार्य करणारा तो क्षत्रिय वर्ण. ज्याच्या अंगी सामर्थ्य आहे त्यालाच हे शक्य. व्यापार उदीम करुन समाजाची आर्थिक प्रगती साधण्याचे कार्य करणारा वैश्य वर्ण.

वरील तीनही गोष्टी जमत नाहीत त्याने या ना त्या कारणाने समाजाची सेवा करणे हे त्याचे कर्तव्य असा सेवाभावी वृत्तीने राहणारा शूद्र वर्ण.

प्रत्येकाने आपला वर्ण आपल्या कुवतीनुसार ठरवावा. प्रत्येकाने आचरण करणे हा त्याचा धर्म होय. ( 'खाण तशी माती' या न्यायाने बलदंड पुरुषाचे पोटीच बलवान पुत्र निपजणार. म्हणून क्षत्रियाचा पुत्र क्षत्रिय ठरू लागला. पुढे हा वर्ण जन्माने ठरू लागल्यामुळे त्या मूळ कल्पनेचा विपर्यास झाला, हा भाग निराळा. )

तात्पर्य, वयाच्या प्राथमिक अवस्थेतच आपल्याला आपला धर्म कळला पाहिजे. आपले कर्तव्य आपण ओळखले पाहिजे. हा आयुष्याचा पहिला टप्पा. हाच ब्रह्माचर्याश्रम! दुसरा टप्पा गृहस्थाश्रम! तिसरा पुढील पिढीवर सर्व जबाबदाऱ्या (टाकून,नव्हे-) सोपवून वनात वास करणे हा वानप्रस्थाश्रम ! त्याही पलिकडे आयुष्य उरले तर सहांचा (म्हणजे षड्रिपूंचा) न्यास करुन, म्हणजे काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांचा त्याग करून पुढचा प्रवास करणे- हा संन्यासाश्रम! असा प्रवास करण्याइतके आयुष्य लाभले आणि प्रत्येक टप्प्यावर जर ते व्यवस्थित वळले तर अंतिम साध्य असलेला 'मोक्ष' सहजसाध्य ठरेल यात शंका नाही.

(अशा तऱ्हेने) चार वर्ण, चार आश्रम आणि चार पुरुषार्थावर बेतलेल्या जीवनपद्धतीप्रमाणे मनुष्य जीवनाची जन्मापासून मृत्यूपर्यंतची वाटचाल कशी असावी याचे चपखल, बुद्धीला आणि मनालाही पटेल असे विवेचन अन्यत्र सापडणे दुर्मिळच.

प्रत्येक वर्ण सारखाच महत्त्वाचा. प्रत्येक वळणावरचे साध्यही सारखेच महत्त्वाचे. तसेच प्रत्येक आश्रम देखील तितकाच महत्वाचा. तरीही 'धन्यो गृहस्थाश्रमः'असे म्हटले जाते. हा मानवी जीवनाचा दुसरा टप्पा. आपला वर्ण कोणता? आपला धर्म कोणता? आपले कर्तव्य काय? या प्रश्नांची उत्तरे प्राप्त केल्यानंतर कोणत्याही वर्णातील व्यक्तीने गृहस्थाश्रम स्वीकारून धर्म, अर्थ, काम या पुरुषार्थांची प्राप्ती करावयाची असते. पत्नीच्या

***(पुढील मजकूर पृ.२० वर)***



# शहाणे करून सोडावे, सकळजन..


-सौ.राधा मराठे,

१९-बी, प्रज्ञातेज अपार्टमेंट, प्रज्ञा पार्क, स.नं. ५४/३, कोथरुड, पुणे ४११०३८.

दूरध्वनी ०२० - २५३६०००४ सेल: ९८५०४ ३३६३१


परवा काही कामासाठी एका गृहस्थांकडे गेले होते. या गृहस्थांचा ज्योतिषाचाही चांगला अभ्यास आहे. मी गेले तेव्हा एक बाई त्यांच्या मुलाची पत्रिका दाखवीत होत्या. त्याच्या शिक्षणात अपयशाची मालिकाच लागली होती. त्याने त्या फार हवालदिल झाल्या होत्या. या गृहस्थांनी पत्रिका हातात न घेताच शेरा मारला,

"अहो, त्याला म्हणावं, नीट मन लावून अभ्यास कर, तुझ्या वकुबाइतके मार्क तुला नक्की मिळतील."

आता मन लावून अभ्यास केला की वकुबाइतके मार्क मिळतील हे सांगायला ज्योतिषी लागतो का? पण आपल्या मुलांसाठी काहीतरी उपाय करता आले तर पाहावे अशा आशेने काही सश्रद्ध माणसं पत्रिका घेऊन ज्योतिषांकडे जात असतात. पत्रिका पाहायचं आपलं काम सोडून हे असले अनाहूत सल्ले देऊन संबंधितांना चारचौघांत शरमिंद करण्यात काय अर्थ. पण अशा माणसांनी आपल्या नित्याच्या व्यवसायाबरोबर एक मोफत सल्ला केंद्र चालवलेलं असतं. फक्त दारावर त्याची पाटी नसते एवढंच!

याच गृहस्थांनी त्या बाईच्या बरोबर आलेल्या बाईंना विचारलं,

" काय दारु सुटली का जावयांची? मी म्हटलं होतं तुम्हाला. एक नंबरचा - - - माणूस असणार तो, मुलीला म्हणावं, सरळ घटस्फोट घे आणि मोकळी हो."

घटस्फोट घ्यायचा म्हणजे काय बाजारात जाऊन वस्तू घेण्याइतकं सोपं आहे का? किती मोठा निर्णय असतो बाईसाठी. अवघं आयुष्य पुन्हा सुरू करायचं, उभं राहायचं. खाऊ आहे का? पण बोलायला, सल्ला द्यायला कष्ट थोडेच पडतात? (आणि पैसे आपले खर्च तर होतच नाहीत, उलट कधीतरी आपल्यालाच मिळतात थोडेफार.) ही असली मोफत सल्ला केंद्र आपल्याला जागोजागी दिसतात. यातली काही केंद्र तर फिरती असतात! ती आपल्याला बाजारात, थिएटरात, बसमध्ये, रेल्वेमध्ये कुठेही भेटतात. ती सावज हेरतच असतात. जरा कुणी आपल्या जवळपास आलं की पकडा आणि करा सुरू सल्ला केंद्र!

माझ्या मुलीचं लग्न ठरलं. एक दिवस सोसायटीतल्या कुलकर्णी वहिनींनी मला बँकेत गाठलं.

"काय, तुमच्या राजसीचं लग्न ठरलं ना?"

"हो. गेल्या रविवारीच साखरपुडा झाला."

"काय करतात जावई?"

मी मोठ्या कौतुकाने जावयांची माहिती पुरवली. सावज सापडल्याच्या आनंदात कुलकर्णी वहिनींचे डोळे चमकले.

"नाव काय म्हणालात?"

मी पुन्हा नाव सांगितलं.

"अहो, म्हणजे तुमच्यापैकी नव्हेत!"

"नाही, ते XXXX आहेत."

"अग्ग बाई, म्हणजे इंटरकास्ट मॅरेज वाटतं.?" (हा शब्द इंग्रजीतच बोलायचा असतो. मराठीत आंतरजातीय विवाह म्हटलं तर ते अगदीच साधं सरळ वाटतं. इंटरकास्ट मॅरेजमधला सनसनाटी भाव जाणवत नसावा बहुतेक!) लग्गेच त्यांच्यातली सल्लागार जागी झाली.

"अहो, आजकाल काय सग्गळं चालतं. जातीपातीत काय आहे एवढं मोठं. आपली मुलगी सुखात राहिली की पावलं म्हणायचं आणि गप्प बसायचं. शेवटी मुलाचं शिक्षण, नोकरी हेच महत्वाचं. आजकाल ही मुलं प्रेमात पडतात आणि लग्न करतात. आता प्रेमात पडताना काय जातीचा दाखला मागून का प्रेमात पडता येतं. ते आपलं आपोआपच होत असतं सगळं........."

हुश्श ! या लग्नाला आमचा तीव्र विरोध असणार आणि मुलगी ऐकत नाही म्हणून अगदी नाईलाजानेच आम्ही या लग्नाला तयार झालो असणार हे त्यांनी अगदी पक्कं गृहीतच धरलं होत. आणि आजकालच्या काळात आईबापांनी आपल्या मताचा आग्रह न धरता मुलांच्या मनाचा विचार कसा करावा या विषयावर भर बँकेत त्यांनी एखाद्या व्याख्यानमालेत बोलत असल्याच्या थाटात भाष्य सुरू केलं होतं. आजूबाजूचं पब्लिक माझ्याकडे पाहत होतं. मी जेमतेम त्यांना टाळून सटकले.

गेल्या आठवड्यात डॉक्टरांकडे गेले होते सासूबाईंचं औषध आणायला. तेव्हा नेमक्या देशपांडे बाई भेटल्या.

"काय सासूबाईंचं औषध वाटतं?"

"होय हो. बी. पी. वाढलंय. फार त्रास होतोय."

"अहो, या वयात असंच होणार. वैतागून कसं चालेल? त्यांनी आपल्या नवऱ्यासाठी किती केलेलं असतं. आपली मुलंही त्यांच्याच जीवावर वाढली ना. मग करायलाच हवं सगळं व्यवस्थित. आपणच त्यांच्याशी हिडीस फीडीस करून वागलो तर आपली मुलं म्हातारपणी आपल्याशी तशीच वागतील. त्यांची सेवा करणं हे तुमचं कर्तव्यच आहे हो."

मी माझ्या सासूबाईंशी हिडीस फीडीस करून वागते, त्यांच्याकडे दुर्लक्ष करते असा समज अकारण करून घेऊन त्यांनी माझं बौद्धिकच घ्यायला सुरुवात केली होती!

डॉक्टरांनी सासूबाईंसाठी लिहून दिलेली औषधं आणायला केमिस्टकडे गेले होते. तिथे दोन तरुण मुली होत्या. एकीच्या चिंटूला सर्दीने हैराण केले होते. दुसरीने लगेच सांगितलं,

"अग, त्याला - - - दे. माझ्या निकीला पण अश्शीच सर्दी झाली होती. डॉक्टरांनी तिला हेच औषध दिलं, दोन दिवसात एकदम फिट झालं पिल्लू."

मी दचकले. एवढ्याशा पोराला डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय काहीतरी ॲंटीबायोटिक्स देणं म्हणजे जरा - - -! पण चिंटूची आई हुशार निघाली. तिने निकीच्या आईच्या सल्ल्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केलं आणि तिला हवा असलेल्या वस्तूच फक्त घेऊन ती गेली.

दुसऱ्याला मोफत सल्ला देणं ही एक प्रकारची नशाच असते. '*शहाणे करून सोडावे, सकळजन*' याची काही माणसांना अगदी तळमळ लागलेली असते. स्थळ काळ वेळ याचं काहीही भान न बाळगता ही सल्लाकेंद्रं मोठ्या जोमाने कार्यरत असतात. पण त्यांना टाळण्यातच आपलं भलं असतं. प्रत्युत्तर करायला गेलं की उगाचच वाईटपणा येतो. डोकं चढतं ते वेगळंच. त्यापेक्षा आपण सरळ ....



# गुणवत्ता पारितोषिके आणि शैक्षणिक-वैद्यकीय मदत
## यांसाठी १५ ऑगस्ट २००८ पूर्वी अर्ज पाठवावे.

**२००७-०८ मध्ये** १०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान ६०% गुण) पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक स्पर्धा/परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. **अभ्यासेतर क्षेत्रांत किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य** मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके /बिनव्याजी कर्जे दिली जातात. याशिवाय **कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पुढील पारितोषिकेहि** देण्यात येतात-

**१.** श्री. सी. गो. खांबेटे (पृ.६७६) प्रायोजित **कु.अनिता खांबेटे स्मृती पारितोषिके प्रत्येकी रु.२५०** इ.१०वी, इ.१२वी, प्राथमिक शिष्यवृत्ती(इ.४थी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ.७वी) या परीक्षांत **मराठे परिवारांत** सर्वाधिक गुणांसाठी.

**२.** सौ.सुलभा अनंत मराठे (पृ.३२७) प्रायोजित **हिंदी पारितोषिक-रु.१००** इ. १० वीच्या परीक्षेत १०० मार्कांच्या हिंदी विषयात **मराठे परिवारांत सर्वाधिक** गुणांसाठी.

**३** श्रीम. लीला दिगंबर मराठे, नाशिक (पृ.३६३) प्रायोजित **कै. दिगंबर दत्तात्रेय मराठे स्मृती इंग्रजी पारितोषिक रु. ९००** इ.१० वीच्या परीक्षेत इंग्रजी विषयात **मराठे परिवारांत सर्वाधिक** गुणांसाठी (२००८ पासून सुरू).

**४.** श्री.प्रभाकर गणेश मराठे (पृ ६१) प्रायोजित **गणेश तंत्रशिक्षण पारितोषिक-रु.५००**

**पात्रतेचे निकषः-**अ) इ.१० वीच्या परीक्षेत तांत्रिक (व्होकेशनल) विषय घेऊन **मराठे परिवारात सर्वाधिक** गुण मिळवणाऱ्यास, ब) इ.१० वीला तांत्रिक विषय नसले तरी १०वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, कंप्युटर इंजिनियरिंग यांसारख्या अभियांत्रिकीच्या कोणत्याही विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १०वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुणांसाठी. (*मात्र १०वीला अभियांत्रिकी विषय घेणाऱ्यास अग्रक्रम देण्यांत यावा.)*

**५.** श्रीम.जयश्री ज.मराठे (पृ.३७१) प्रायोजित **कै.जगन्नाथ दामोदर शिष्यवृत्ती-वार्षिक रु.२०००** ऑटोमोबाईल इंजिनियरिंग शिक्षण घेणाऱ्या (पदवी, पदविका अथवा आय.टी.आय.) **मराठे परिवारातील** विद्यार्थ्यासाठी.

**५.**श्रीम.शालिनी धुंडिराज मराठे(पृ.१३४) प्रायोजित **वैदिक शिक्षण/हिंदुधर्मप्रचार यांसाठी पुरस्कार-वार्षिक रु.१०००.**

**६. शैक्षणिक (बिनव्याजी) कर्ज -**

**कै.विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनिरिंग शिक्षणासाठी** बिनव्याजी कर्ज (रु. ३०,००० पर्यंत) दिले जाते.

**शैक्षणिक, वैद्यकीय मदत**

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते. बायपास, कॅन्सर यासारख्या मोठ्या आजारासाठीहि खास निधीतून (विशिष्ट हेतु निधी) मदत मिळू शकते.

वर उल्लेखिलेली गुणवत्ता पारितोषिके / बिनव्याजी कर्ज यांसाठीचे **तसेच शैक्षणिक, वैद्यकीय मदतीसाठीचे अर्ज दि.१५ ऑगस्ट २००६ पर्यंत** प्रतिष्ठानकडे पाठवावे.

पारितोषिकांसाठीचे अर्ज फक्त **२००७-०८** या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वतः विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे..(मात्र पात्रतेसाठी सदस्यत्व ही अट नाही.)

निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत **व** सोबत आयडेंटिटी कार्ड आकाराचा फोटो **अर्जाला जोडून** पाठवावा. शक्य असेल त्यानी ही माहिती ई-मेल वरून पाठवावी म्हणजे मिळाल्याची खात्री करून घेता येईल.**खास बक्षिस योजनेखाली** (हिंदी , तांत्रिक विषय, ऑटो इंजि., वैदिक शिक्षण/ हिंदुधर्म प्रचार याबाबत) **अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.**

**पूर्ण नांव-पत्ता, दूरध्वनी /मोबाईल तसेच ई-मेलचा उल्लेख केल्यास त्वरित संपर्क साधता येईल**

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना सहाय्यासाठीहि कुलबांधवांनी निःसंकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनो!
आपले अर्ज ई-मेल ने पाठवताना सोबत फोटो व गुणपत्रिका स्कॅन करून पाठवायला विसरू नका. शेवटची तारीख १५-८-०८

नवीन उपक्रमांसाठी आवाहन

## १.हितगुजची हेल्पलाईन

आपल्या परिवारात अनेक व्यक्ति अशा आहेत की ज्या काही विशेष सेवा, मार्गदर्शन, सल्ला देऊ शकतात. उदा. वैद्यकीय क्षेत्रातले तज्ञ, थेरपिस्ट, वकील, समुपदेशक, लेखापरिक्षक, इन्व्हेस्टमेंट एजंट, वास्तूविशारद इ. आपल्यापैकी प्रत्येकाला कधी ना कधी अशा सेवा सुविधांची गरज लागते. बऱ्याच वेळा असे होते की आपल्याला हवी असलेली नेमकी मदत कुठे मिळेल हे माहित नसते. हितगुज ही माहिती देणारा दुवा बनू शकतो. काही व्यक्ती खूप वेगळ्या प्रकारचे कार्य करत असतात. पण बऱ्याच जणाना असे काही काम अस्तित्वात आहे हे सुध्दा माहित नसते. अशा सर्व व्यक्तींनी हितगुजकडे आपली माहिती पाठवावी किंवा नसलेल्या माहितीसंबंधी **'कुठे? कुणाकडे?'** अशी पत्राने विचारणा करावी त्यातून **'हितगुजची हेल्पलाईन'** तयार होईल आणि तुमच्या कामाची माहिती परिवारातील सर्वांपर्यंत पोहोचेल. हितगुज खऱ्या अर्थाने संपर्क माध्यम बनेल. परिवारातील व्यक्तींसाठी खास सवलत देऊ इच्छिणाऱ्या सेवा-दात्यांनी आमचेकडे प्रस्ताव पाठविल्यास त्याना हितगुजच्या माध्यमातुन प्रसिद्धी दिली जाईल. - संपादिका

दि. १७-५-२००८

मा. अध्यक्ष,
मराठे प्रतिष्ठान

मी संस्थेच्या नियोजित इमारत (वास्तु)-प्रकल्पासाठी रु. १०००० चा पहिला हप्ता (अनामत ठेव) म्हणून दिले होते. काही कारणाने हा प्रकल्प कार्यान्वित होत नसल्याने जमलेल्या (अनामत) रकमा परत करण्याचे ठरले आहे. माझी आपणास विनंती आहे की ही रक्कम मला परत न करता संस्थेला योग्य वाटेल त्या कामासाठी संस्थेकडेच ठेवत आहे.

कळावे,
आपला
मोहन स. मराठे

(श्री.मोहनरावांच्या या उदार देणगीसाठी मराठे प्रतिष्ठान अत्यंत आभारी आहे -अध्यक्ष)



# माझी 'संगीत' वाटचाल

-शेखर खांबेटे (जु. ७०५) एल- ४३ रिझर्व बँक क्वॉर्टर्स.
मराठा मंदिर मार्ग .मुंबई चेंट्रल, मुंबई ४००००८
दूरध्वनी २३०२ ३८१३ / सेल- ९८६९०४६१६५

*( अलिकडे मराठे परिवारातील अनेक व्यक्ती या ना त्या चॅनेलवर वा अन्य माध्यमामध्ये चमकताना दिसू लागली आहेत. प्रतिष्ठानच्या अनेक लहान-थोर, प्रसथापित-नवोदित, सदस्यांमध्ये विविध प्रकारचे कलागुण असतात. या सर्वांबद्दल सामान्य परिवारसदस्यांना कुतूहलयुक्त आपुलकीही असते. पण ती माहिती अन्य कुलबांधवांपर्यंत पोहोचतच नाही. हितगुजच्या माध्यमातून आपल्या सदस्यांच्या कलाक्षेत्रातील उपक्रमशीलतेची परस्परांना ओळख व्हावी यासाठी अशी माहिती आमचेकडे पाठविल्यास अवश्य प्रसिद्ध केली जाईल. आपापल्या कलाक्षेत्रातील उपक्रम, जाहीर कार्यक्रमांचे सादरीकरण, विशेष कर्तृत्त्व, मिळालेले पुरस्कार याबद्दल तपशिलवार माहिती आमचेकडे पाठवावी. त्यामुळे परस्परसंपर्क साधता येऊन आपल्या कलाविष्कारांची अद्ययावत माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत नेणे शक्य होईल. कुणी सांगावे, यातूनच कदाचित "मराठे कलामंच" या संकल्पनेला सुद्धा चालना मिळू शकेल ,नाही का ? गेली अनेक वर्षे तबला वादक साथीदार म्हणून प्रसिद्ध असलेल्या शेखर खांबेटे यांची ही ओळख आपल्याला उद्बोधक वाटेल .-सहसंपादक)*

गेली काही वर्षं म्हणजे जवळ जवळ पस्तीस वर्षं मराठी नाटक, संगीत नाटक आणि संगीत यांत काढल्यावर काही नवीन सुचायला लागलं. वाटलं की हे सर्व लोकांसमोर यायला हवं. म्हणून प्रामाणिकपणे अभ्यास करायला लागलो, त्याचं फलित म्हणजे मी सादर केलेले काही सांगितिक कार्यक्रम. जसे,**१.चक्रसंगीत, २.कृष्ण गाथा, ३.विठ्ठल गीती गावा, ४.भावगीताच्या पाऊलखुणा, ५.रंग लावणीचे इ.** या कार्यक्रमांच्या निमित्ताने निरूपण तयार करण्यासाठी बरेच लेखन करावे लागले. त्यातील दुर्मिळ माहितीचा आपल्या परिवारातील संगीतप्रेमी सदस्यांना संदर्भासाठी उपयोग होऊ शकेल असे वाटल्यावरून हा संकलित लेख सिद्ध केला आहे.

### १.चक्रसंगीतः

आपल्या आयुष्यांत काही चक्रं-आवर्तनं अव्याहतपणे आणि अपरिहार्यपणे येत असतात. टाळूं म्हणता टाळता येत नाहीत अगदी मृत्यूपर्यंत. पहिलं चक्र म्हणजे आयुष्यचक्र, दुसरं दिनमानचक्र आणि तिसरं चक्र अर्थातच ऋतूंचं चक्र. पहिल्या चक्राच्या आऱ्या म्हणजे जन्म, बालपण, तारुण्य, प्रेम, लग्न, प्रौढत्व आणि वृद्धत्व. दुसऱ्या चक्राच्या आऱ्या म्हणजे पहाट, सकाळ, दुपार, संध्याकाळ आणि रात्र. तिसरं चक्र अर्थातचं ऋतूंचं चक्र. ही सर्व चक्रं एकमेकांत इतक्या सुबकपणे आणि नाजूकपणे विणलेली आहेत की ती एकमेकांपासून अलग करता येत नाहीत. इतकेच नव्हे तर त्यांना टाळताही येत नाही. या सर्व चक्रांचं मिळून एक आवर्तन होतं आणि अशी आवर्तनं अगदी सतत आपल्या आयुष्यांत डोकावत रहातात. किंबहुना ही आवर्तनं म्हणजेच आपलं आयुष्य! जर एकेक चक्र पाहिलं तर असं लक्षांत येईल की प्रत्येक चक्राची जी एकेक आरी आहे, त्या प्रत्येकाचं एक संगीत आहे. ते संगीत कसं, काय आहे ते पहाण्याचा प्रयत्न म्हणजेच हा कार्यक्रम. संगीत हे सर्वव्यापी, विश्वव्यापी आहे. संगीतांत काय असतं? शब्द, काव्य,सूर, नाद, लय इत्यादी. पण हे सर्व म्हणजेच संगीत असतं कां? यापेक्षां आणखी काहीतरी वेगळं, आपल्याला धरून ठेवणारं असतं, ते काय? ते जे काय असतं त्याची व्याख्या आतापर्यंत कुणाही शास्त्रकाराला समर्पकपणे करता आलेली नाही. अनादि कालापासून अनंत कालापर्यंत चालत आलेलं आणि पुढेही चालत रहाणारं असं हे संगीत भाषा, शब्द, प्रांत, देश व धर्म या बंधनांच्या पलिकडचं असतं. या कार्यक्रमात संगीताचे विविध बाज सामावून घेण्याचा प्रयत्न केलाय म्हणून यांत फक्त मराठीच गाणी आहेत असं नाही.

### २.कृष्ण गाथाः

आपल्या पुराणातली सर्वात प्रभावी व्यक्तिरेखा ही श्रीकृष्णाची आहे. कां? तर या व्यक्तिरेखेला अनेकविध पैलू आहेत. कृष्णाचं बालरुप, कृष्ण सखा म्हणून, कृष्ण - प्रियकर म्हणून, बंधू म्हणून, शिष्य म्हणून, पती म्हणून, राजा म्हणून, राजकारणी म्हणून, गुराखी म्हणून, योद्धा म्हणून, भगवद्गीता सांगणारा थोर तत्वज्ञ म्हणून, वीरपुरुष म्हणून आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आम्हां संगीतसाधकांच्या दृष्टीने एक संगीतकार - बासरीवादक म्हणून. अशा या श्रीकृष्णाची ही अनेकविध रूपं संगीताच्या माध्यमातून उलगडण्याचा हा एक प्रयत्न आहे आणि म्हणून कार्यक्रमाचं नाव आहे -कृष्ण गाथा.

### ३.विठ्ठल गीती गावाः

आपल्या देशांत अनेक धर्म आहेत आणि ते वेगवेगळ्या प्रांतांत विखुरलेले आहेत. धर्म आला की त्या बरोबर पंथ येतात. वेगवेगळ्या धर्मांचे वेगवेगळे पंथही आपल्याकडे सुखाने नांदताहेत. यांत आपल्या महाराष्ट्रात वारकरी पंथ महत्वाचा. विठ्ठलाच्या / पांडुरंगाच्या भक्तीची पताका फडकत ठेवण्याचं सगळं श्रेय वारकरी संप्रदायाचं आहे.

विठ्ठलभक्ती म्हटली की आपल्याला आठवतात दोन गोष्टीः एक म्हणजे वारकरी संप्रदाय आणि दुसरी म्हणजे पंढरीची वारी. पण वारकरी पंथाच्याही आधी भक्तिमार्गाची सुरवात महानुभाव पंथाने केली होती, साधारण इ.स.११००च्या सुमारास. त्यावेळच्या महाराष्ट्रात सोमेश्वर नावाचा राजा राज्य करीत होता. त्याने ११३१ च्या सुमारास मानसोल्हास नावाचा ग्रंथ लिहीला होता आणि असं म्हणतात की भक्तीमार्गाची बीजं तिथून रोवली गेली. तर या विठ्ठलाकडे अनेकांनी अनेकविध दृष्टीनं पाहिलय, संतांनी अभंग तर रचलेच पण लावण्याही रचल्यात. ओवीपासून लावणीपर्यंत सगळे संगीताचे बाज यांत आहेत अगदी लोकसंगीत सुद्धां. थोडक्यांत शाळकऱ्यापासून ते माळकऱ्यापर्यंत आणि शालजोडीवाल्यांपासून ते बैलजोडीवाल्यांपर्यंतांना विठ्ठलाविषयी काय म्हणायचंय, अर्थात संगीताच्या माध्यमातून, त्यावर हा कार्यक्रम.

### ४.भावगीताच्या पाऊलखुणा :

भावगीत म्हणजे काय? तर ज्यांत भावाचा परिपोष योग्य झालाय, भावभावनांचा एकत्रित असा गुच्छ बांधलाय, असे गीत, जे गेय आहे, गायले जाऊ शकते. पण म्हणूनच प्रत्येक कविता गायली जाऊ शकत नाही. आता कवितेची व्याख्या अशी आहे की कविता म्हणजे भावनांचा उद्रेक! उद्रेक आणि परिपोष यांत फरक आहे. नाही कां? आता आपल्या माहीत असलेलं पहिलं काव्य कोणतं? त्या संबधात एक गोष्ट आहे. एका रानांत झाडावर क्रौंच पक्ष्यांचं युगुल प्रणय करीत होतं. तेवढ्यांत तिथं एक व्याध आला आणि त्याला त्या पक्षाचं मांस खायची इच्छा झाली. त्याने बाण मारला आणि त्या युगुलातला नर पक्षी मरून खाली पडला. हे सर्व वाल्मिकी ऋषींनी पाहिलं आणि ते कळवळून म्हणाले 'मा निषाद!'. असा हा आद्यकवी, ज्याला अगतिकपणे त्या क्रौंच पक्षाची हत्या पहावी लागली. ती हत्या तो थांबवू शकला नाही.

भावगीत गायनाचा संक्षिप्त इतिहास सांगायचा तर सुरुवातीच्या काळात काव्यवाचन व नंतरच्या काळात यशवंत, गिरीश, अनिल, वसंत कानेटकर यांचे चाली लावून म्हटलेले काव्यगायन

**(पुढील मजकूर पृ. १८ वर)**



# चहाच्या गप्पा-भाग१

-ह.मो. मराठे,(पृ.५३७)
एन-२०४, पिनाक मेमरीज, कोथरूड, पुणे ४१००३८; सेल: ९४२३०१३८९२

*(आपले कुलबंधू 'ह. मो. मराठे' ज्येष्ठ पत्रकार आणि प्रसिद्ध लेखक आहेत. हे आपणा सर्वांना माहीत आहेच. ते गंभीर आणि वैचारिक लेखनासाठी माहीत आहेत; पण ते व्यंगात्मक लेखनही चुरचुरीत शैलीत करतात. हे फार थोड्यांना माहीत आहे. व्यंग लेखनाची आपली स्वतःची शैली त्यांनी सिद्ध केली आहे. सध्या ते 'प्रभात' (पुणे) 'एकमत' (लातूर) आणि 'कृषिबल' (अलिबाग) या तीन दैनिक वर्तनामपत्रांत रोज एक चुरचुरीत शैलीतल व्यंगात्मक सदर लिहितात. त्यातील निवडक मजकूर या सदरातून आम्ही आमच्या वाचकांनाही सादर करीत आहोत.-सहसंपादक)*

## १.प्रचारसभा

पोटनिवडणुकीसाठी प्रचारसभा सुरु आहे. अेक नेते भाषण करीत आहेत. स. दा. पक्षांतरे असं त्यांचं नाव आहे. असं आपण समजू. उगीच कशाला आपण कुणाचं खरं नाव घ्या ? श्रीयुत पक्षांतरे सध्या सत्तारुढ सरकारमध्ये मंत्री आहेत. पक्षांतर करून सध्याच्या सत्तारूढ पक्षात येण्याआधी ते दुसऱ्या पक्षात होते आणि मुख्यमंत्री होते. अवघा एकाच वर्षापूर्वीची गोष्ट. ते ज्या पक्षाच्या सरकारात मुख्यमंत्री होते. त्या पक्षाला आपण 'तो' म्हणू. हो ! उगीच कशाला आपण कोणत्या पक्षाचं खरं नाव घ्या ? सध्या ते ज्या पक्षाच्या सरकारात मंत्री आहेत, त्याला 'हा' पक्ष म्हणू. हो ? आपण कशाला कोणत्या पक्षाचं खरं नाव घ्या ? तर, श्रीयुत पक्षांतरे 'या' पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करणाऱ्या सभा घेत आहेत. भाषणाचं मुख्य सूत्र 'त्या' पक्षावर टीका करणं हेच!

श्रीयुत पक्षांतरे यांच्या भाषणाला छोट्यांचा प्रतिसाद चांगला मिळतो आहे. चला, ठोकू या आपणही त्यांचं भाषण -

श्रीयुत पक्षांतरे उवाच -

- त्या पक्षापायी कोणतंही धोरणच नाही. कोणत्याही प्रश्नावर त्यांची धोरणं स्थिर नसतात. सारखी बदलत असतात. आज एक धोरण तर उद्या दुसरं धोरण. परवा तिसरच! ज्या पक्षापाशी दीर्घकालीन धोरणं नाहीत ज्या पक्षाच्या उमेदवाराला मत म्हणजे राजकीय मूर्खपणाला मत ! तुम्ही असा मूर्खपणा करणार काय ? नाही. माझी खात्री आहे की तुम्ही असा मूर्खपणा करणार नाही. लक्षात ठेवा, असा मूर्खपणा केलात तर मेलात !

- 'त्या' पक्षाने कारखान्यांची वाट लावली. हजारो लहानमोठे कारखाने बंद पाडले. शेकडो कारखाने परप्रांतात गेले. लाखो कामगार देशोधडीला लागले. त्यांच्या संसारांची धूळधाण झाली. 'तो' पक्ष कामगार विरोधीच आहे. तो मालकांचा आणि भांडवलदारांचा पक्ष आहे. पैसेवाली मंडळी त्याला पैसा पुरवतात. कामगारविरोधी कायदे करून घेतात. त्यामुळे कामगार उद्ध्वस्त होतो. कामगारांनी तर 'त्या' पक्षाच्या उमेदवाराला मत देताच नये. लक्षात ठेवा : 'त्या' पक्षाला मत म्हणजे आपल्याच हाताने आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणं !

- 'त्या' पक्षाच्या सत्ताकारणात शेतकरी पुरता देशोधडीला लागला. त्याच्या शेतमालाला पुरेसा भाव मिळाला नाही. शेतीला पाणी मिळालं नाही. पाच वर्षात एकही नवं धरण राज्यात झालं नाही. 'त्या' पक्षाच्या उमेदवाराला मत म्हणजे शेतकऱ्यांनी आपल्या हाताने आपल्या गळ्यात आत्महत्येसाठी दोरीचा फास अडकवून घेणं. ते करु नका!

- 'त्या' पक्षाचं सरकार असताना शिक्षणाचा तर खेळखंडोबाच झाला. बट्ट्याबोळ झाला.

'त्या' पक्षाच्या सत्ताकालात गुन्हेगारीचं प्रमाण प्रचंड वाढलं. बायाबापड्यांची अब्रू भर रस्त्यात लुटली गेली. 'त्या' पक्षाच्या........

अेक श्रोता उठून उभा राहिला आणि त्याने विचारलं, साहेब, 'त्या' पक्षाच्या सरकारात तुम्हीच मुख्यमंत्री होता. तुम्ही सांगताय त्या सर्व परिस्थितीचं खापर तुमच्याच डोक्यावर फोडायला हवं ! होय नां "अजिबातच नाही !" श्रीयुत पक्षांतरे ठामपणे उत्तरले, "मी अकार्यक्षम मुख्यमंत्री ठरलो हे खरं, पण त्याला जबाबदार कोण ? 'तो' पक्ष ! म्हणूनच मी सांगतोय की अकार्यक्षम मुख्यमंत्री देणाऱ्या अकार्यक्षम पक्षाच्या उमेदवाराला एकही मत देऊ नका ! "

श्रोत्यांनी जोरदार टाळ्या पिटल्या !

-०-

## २.पूजा

प्यारे ब्रिजभूषण,पाटणा (बिहार),
याला मुंबईहून किशन यांचा नमस्कार !

इकडे 'मनसे' चं आंदोलन सुरु झाल्यानंतर तू आपल्या गावाला निघून गेलास तेव्हापासूनच तूझी काहीच खबरबात समजली नाही. त्यामुळे काळजी वाटून आज हे पत्र पाठवीत आहे. शक्यतो तू स्वतःच इकडे निघून ये. निदान पत्र तरी पाठव आणि खुशाली कळव. माझा मात्र आग्रह आहे की तू शक्य तेवढ्या लवकर इकडे यावंस. इथली परिस्थिती अेकूण शांत आहे. महाराष्ट्राच्या सरकारने (म्हणजे आबांनी) आपणा बिहारींना अभय दिलेलं असून आपले थोर नेते संजय निरुपम यांनी बिहारींच्या संरक्षणासाठी सुरक्षादलं स्थापन करण्याची चळवळही सुरु केली आहे. ते बहुधा आपणाला लाठ्या देतील असं म्हणतात. हे संजय निरुपम फक्त वर्तमानपत्री पुढारी आहेत ही गोष्ट वेगळी. आधी ते शिवसेनेतर्फे राज्यसभेवर गेले होते. अेक दोन वर्षांपूर्वीच ते काँग्रेसमध्ये, आले हे तुला माहित असेलच. आपणाला घाबरण्याचं कारण नाही ते आणखी दोन गोष्टींमुळे. एक म्हणजे दोघे ठाकरे बंधू आपापसातच भांडत बसलेले आहेत. दुसरं म्हणजे आपल्या लाडक्या लालूसाहेबांनी छटपूजेवरुन राजसाहेबांना दिलेलं प्रति आव्हान! ते इथे येऊन शिवाजी पार्कवर छटपूजा करणार आहेत. नेता असावा तर असा, होय की नाही ? आपणा मुंबईकर बिहारींसाठी ते स्वतः पुढं सरसावले आहेत.

या छटपूजेबद्दलचा एक खुलासा मी एकदोन दिवसांपूर्वीच वाचला. तो मुद्दाम तुला कळवीत आहे. लालूंचा पक्ष म्हणजे राष्ट्रीय जनता दल. त्या पक्षाचे कोणीतरी श्याम रजक म्हणून जनरल सेक्रेटरी आहेत. त्यांनी म्हटलं आहे की लालू शिवाजी पार्कवर सपत्निक छटपूजा करणार आहेत, पण ती शक्ति प्रदर्शन करण्यासाठी नाही. ते छटपूजा करणार आहेत. ती महाराष्ट्राची भरभराट व्हावी यासाठी! एवढ्या उदात्त हेतूने लालूप्रसाद पूजा करणार आहेत, हे समजून मला किती आनंद झाला म्हणून सांगू !

आता तर आपणाला काही काळजी करण्याचंच कारण नाही. महाराष्ट्राची भरभराट झाली. ती आमच्या बिहारी लालूप्रसादांनी केलेल्या छटपूजेमुळे, असं आपण अभिमानाने 'मनसे' वाल्यांना सांगू शकू. वर असंही म्हणू शकू की महाराष्ट्राच्या भरभराटीसाठी आम्ही बिहारींनाही कष्ट केले आहेत. म्हणून त्या भरभराटीची फळं आम्हालाही चाखायचा

हक्क आहे. आम्ही या अधिकारानेच इथं मुंबईत येऊन राहणार ! काय म्हणणं आहे तुमचं ? होतील की नाही 'मनसे' वाले निरुत्तर? असा जबरदस्त प्रतिप्रश्न मला सुचला तेव्हां तू इथं हवा होतास. मला मिठीच मारली असतीस!

असा प्रतिप्रश्न विचारल्यावर कोणीतरी खवचटपणे पुढील सवाल आम्हाला विचारणारच. लालू छटपूजा करून महाराष्ट्राची प्रगती घडवून आणणार असतील तर ते त्यांच्या बिहारचीच प्रगती का घडवीत नाहीत?

या प्रश्नाला कसं उत्तर द्यायचं ते मात्र मला सुचत नाहीय. तुला काही सुचलं तर सांग. त्यासाठी तू स्वतःच इकडे ये!

मुलाला घेऊन वडील पटकन बाहेर पडले. मार्गदर्शकाने फीही मागितली नाही. कारण, त्यालाच नवी लाईन सापडली ना!

-०-

## ३.व्यवसाय

एक माणूस आपल्या मुलाला घेऊन व्यवसाय मार्गदर्शन केंद्रात आला. केंद्र संचालकाला त्याने विचारलं,

"तुम्ही व्यवसाय मार्गदर्शन करता ना?"

"नाही तर काय हजामती करतो? ऑफिसवर पाटी काय लावली आहे मी? नीट वाचलीत ना?"

"म्हणूनच मुलाला घेऊन आलोय."

"बोला, काय करू?"

"माझ्या मुलाने काहीतरी व्यवसाय करावा अशी इच्छा आहे -"

"मी पैसा देऊ शकणार नाही."

"पैसा नको हो! सल्ला द्याल की नाही?"

"तोच द्यायला बसलोय ! बिचारा."

"त्याची ॲप्टिट्यूड टेस्ट घ्या आणि सांगा की तो कोणता व्यवसाय करु शकेल?"

अशा प्रेमळ प्रास्ताविक संवादानंतर व्यवसाय मार्गदर्शकाने मुलाला समोर बसवलं. मुलाच्या वडिलांनी कान टवकारून आणि उत्सुक मनाने ऐकायला सुरुवात केली. मुलाने व्यवसाय तर करावा. पण त्यात फार पैसा गुंतवावा लागू नये, झालंच तर व्यवसाय असूनही कायम स्वरुपाच्या केंद्र सरकारच्या नोकरीइतका 'सेफ' असावा, अशी बाप म्हणून त्याची इच्छा होती.

"तुला खेळायला आवडलं ?" मार्गदर्शकाने विचारलं.

"होय." मुलगा म्हणाला.

"कोणता खेळ ?"

"क्रिकेट, बुद्धिबळ, पत्ते."

"क्रिकेट का आवडतं ?"

"त्यातल्या अनपेक्षितपणामुळे. सचिन सेंच्युरी पूर्ण करणारच अशा अपेक्षेने बघावं तर तो झीरोवर आऊट होतो. मजा येते अशा वेळी."

"बुद्धिबळ कशामुळे आवडतं ?"

"काहीही न करता तासन तास वेळ घालवता येतो!"

"पत्ते?"

"हुकमाची सत्ती सुद्धा राजाला मारू शकते. प्रत्यक्षात असं कधी घडतं? शिपाई साहेबाला सस्पेंड करू शकतो?"

व्यवसाय मार्गदर्शकाची मुलाकडे बघण्याची दृष्टी बदलली. त्याला मुलाची उत्तरं इंटरेस्टिंग वाटू लागली. त्याने आणखी काही प्रश्न विचारले. मुलानं उत्तरं दिली.

"तुला अेव्हरेस्टवर चढाई करायला आवडेल?"

"चल! सांगितलं कोणी ते मूर्ख साहस करायला?"

"ताशी दोनशे कि.मी. वेग पकडणारी मोटरसायकल कोणी तुला फुकट दिली तर तू ती स्वतः चालवशील का?"

"नाही ! मी चाळीसच कि. मी. वेगाची मोटार घेईन, पण चालवायला ड्रायव्हर ठेवीन."

बरीच प्रश्नोत्तरं झाल्यावर मार्गदर्शक वडिलांना म्हणाला "तुमचा मुलगा क्रिकेटीयर होऊ शकणार नाही, कारण त्याला क्रिकेट खेळाडूंचा पैसा रोमहर्षक वाटत नाही. तो शेअर बाजारचा व्यवसाय करु शकणार नाही. कारण तो व्यवहारातल्या शक्याशक्यतेवर भर देतो. तो वकिली चांगली करील. कारण काहीही न करता वेळ घालवायला त्याला आवडतं. तो इतरही कोणता व्यवसाय करू शकेल. पण चोरीचा व्यवसाय करू शकणार नाही. एवढं नक्की. कारण त्याला साहस करून बघायला आवडत नाही, चोरीचा व्यवसाय करायचा तर खूप आहेस, कल्पकता आणि नावीन्याचं आकर्षण लागतं. उदा. औरंगाबादची घटना. खाजगी बसच्या डिकीत बॅगेत बसून प्रवास करताना इतरांचं सामान उघडून चीजवस्तू चोरायच्या ! ते करताना मोबाईल फोनचाही चातुर्याने वापर करायचा .आहा! केवळ फॅंटॅस्टिक ! असलेच व्यवसाय कसे करावे याचेच मार्गदर्शन क्लासेस मी काढणार आहे."

मुलाला घेऊन वडील पटकन बाहेर पडले. मार्गदर्शकाने फीही मागितली नाही. कारण, त्यालाच नवी लाईन सापडली ना !

-०-

## ४.सबुरी

आमची सुप्रसिद्ध कापडी पिशवी घेऊन आम्ही घर सामान आणण्यासाठी बाहेर पडलो.

नेहमीच्या किराणाभुसारवाल्याकडे गेलो. सावलीत उभे राहिलो. ऊन कडाक्याचं होतं. जवळच्या जवळ तर जायचं म्हणून छत्री घेतली नव्हती. उन्हाच नवी टोपी तेवढी डोकीवर घातली होती. नाहीतरी, हल्ली ज्येष्ठ नागरिकसुद्धा उन्हासाठी छत्री घेऊन बाहेर पडत नाहीतच.

आम्ही किराणभुसार दुकानदाराला म्हणालो, "दोन किलो साखर, एक किलो साबण, पाव किलो तूप, अर्धा किलो मूगडाळ -"

त्याने सामान बांधून दिलं.

"किती झाले?" आम्ही खिशातून पैसे काढत म्हणालो.

दुकानदाराने बिल सांगितलं.

"इतके?" आम्ही आश्चर्याने म्हणालो, " गेल्या आठवड्यात याच वस्तू याच मापात मी घेऊन गेलो होतो. बारा रुपये आज जास्त झाले?"

"भाव वाढले साहेब." दुकानदार म्हणाला.

"एकाच आठवड्यात?" आमच्या स्वरात थोडीशी चीड आलेली.

"संयम, संयम बाळग, बेटा !" - कुठून तरी शब्द आमच्या कानी पडले. आम्ही बाजूला बघितलं एक आजी नातवाला घेऊन आली होती. तो कशासाठी तरी हट्ट करीता होता. त्याला आजीने सल्ला दिला असावा.

"या वेगाने जर भाववाढ होऊ लागली -" आम्ही पुटपुटलो. आमच्या स्वरात मारा होता.

"सबुरीने घे, सबुरीने !"

आम्ही पाहिलं. आजीबाईच नातवाला काही तरी सांगत होती.


या वेगाने भाव वाढायला लागले तर त्याला साकार कसा आवर घालणार आहे देव जाणे !" त्रागा करीत आम्ही उद्‌गारलो.

"श्रद्धा ठेवा !!" आम्हाला शब्द ऐकू आले.

"या सरकारवर श्रद्धा ठेवू म्हणता ?" आम्ही दुकानदारावर रागावत विचारलं आणि पैसे दिले त्याने पैसे घेतले. ड्रॉव्हरमध्ये ठेवले.

"श्रद्धा ठेवा म्हणे! तुम्हा दुकानदारांना काय!

***(पुढील मजकूर पृ. ११ वर)***



# ओवाळणी

-विनायक केशव मराठे (पृ.२०)
सी-४,स्वप्नसाफल्य, ॲनी बेझंट रोड, वरळी ,मुंबई ४०००२५; .☎: २४३०३३२९

भगवंताला करुणासागर म्हणतात. भक्तवत्सल म्हणतात. भावाचा भुकेला म्हणतात. पण आमच्या सावित्रीचा होलपट पाहिला की हा भगवंत तिच्या मदतीला का आला नाही. आयुष्यातला सारा रस आटून गेल्यावरच हिच्याकडे वळून पाह्यला काय कारण असावं तेच कळत नाही. आपले भोग आपणच भोगायचे हे तत्त्वज्ञान ठीक आहे. पण असं असेल तर मुळात भगवंताचं स्थानच काय! असा प्रश्न एखाद्या हालअपेष्टांच्या आगीत होरपळत असलेल्या माणसांनी विचारला तर उत्तर, ते सुद्धा समाधानकारक उत्तर, देणं कठीण आहे.

काही माणसं जन्मखुणा घेऊन जन्माला येतात. सावित्री दारिद्र्याची, दु:खाची, अपमानित जीवनाची जन्मखूण घेऊनच जन्माला आली होती. तिचा जन्म एका गरीब भिक्षुकाच्या घरात झाला. हा दशग्रंथी ब्राह्मण दारिद्र्याच्या महादशेत जन्मला आणि दु:खाच्या अंतर्दशेत जग सोडून गेला. सावित्रीच्या मोठ्या तीन बहिणी उजवताना गोपाळ भटजींना घरदार व पदरी असलेली टीचभर जमीनही विकावी लागली. चार कोसांवर असलेल्या देवघरांच्या घरात मुलगा लग्नाचा आहे हे समजल्यावरुन गोपाळ भटजीनी धाव घेतली.

देवधरांचं घर खाऊनपिऊन सुखी होतं. थोडीफार शेती होती. खालच्या आगरात आंबा, कोकम, नारळ यांची पांच पंधरा झाडं होती. देवधर बंधूंपैकी दोघे कष्टाळू होते पण शेंडेफळ मात्र अगदी विरूद्ध दिशेचं. घरात काम करणं बाजूलाच पण अचकट विचकट बोलणं, घाणेरडं रहाणं, यानी तो कोणालाच नको होता. सकाळी पोटभर पेज रिचवून हा गृहस्थ कानाला फूल अडकवून हातातली काठी गरगर फिरवीत दिवसभर गांव धुंडाळत बसे. अखेर गावकऱ्यांचा सल्ला घेऊन या दांडग्या बैलाला लग्नाची वेसण घालण्याचा निर्णय देवधर बंधूनी घेतला.

शुभमंगल सावधानच्या घोषांत आंतरपट बाजूला झाला. गोऱ्यापान, नाजूक सावित्रीनी हार घालण्यासाठी मान वर केली आणि समोरच्या आडदांड, काळ्याकभिन्न राक्षसाकडे पाहून तिची बोबडीच वळली. हात थरथरु लागले. देवधरांचे गुरुजी पुढे सरसावले. सावित्रीचा हात घट्ट पकडून त्यांनी बळजबरीने नवऱ्यामुलाच्या गळ्यात हार घालण्यास सावित्रीला भाग पाडले. नवऱ्यामुलानी सावित्रीच्या विरोधाला न जुमानता म्हशीच्या गळ्यात दावं अडकवतात तसा सावित्रीच्या गळ्यात हाराचा फांस टाकला!

सावित्री देवधरांच्या घरांत सावित्री या नावानेच आली. कारण सावित्रीच्या दिरानी मनात आणलं की ही सावित्री नवऱ्यापाठी पुराणातल्या सावित्रीसारखी ठाम उभी राहील. कदाचित तिचा नवरा सुधारेल.

पण तसं झाल नाही.

सावित्रीचा नवरा होता तसाच राहिला. बिनकामाच्या माणसाला कुटुंबात कसली वागणूक मिळणार?

सावित्रीचा वनवास सुरु झाला. ऊर फुटेपर्यंत काम करायचं. घरातल्या माणसांकडून सोडाच, पण खुद्द नवऱ्याकडूनसुद्धा प्रेमाचा एकही शब्द तिच्या पदरी पडत नव्हता. दुर्दैव तिच्या हात धुवून पाठी लागलं होतं. पहिली मुलगी झाली म्हणून सासर नाराज. दुसरी मुलगी झाल्यावर शिव्याशापांचा वर्षाव. तिच्या नवऱ्याचे प्रताप दिवसेंदिवस वाढतच चालले. पडवीतले नारळ नाहीसे होत. घरातल्या लहान सहान भांड्याना पाय फुटत. प्रत्येक प्रसंगी सावित्रीच्या नवऱ्याची हजेरी घरची माणसं घेत. मग हा सगळा राग सावित्रीवर निघे. रात्री आवराआवर झाल्यावर सावित्रीचा नवरावतिला गुरासारखं मारित असे. त्याचीही सवय सावित्रीला झाली होती. घरात भांडणं झालं की सावित्री दाराला कडी लावून तोंडात कापडाचा बोळा कोंबून नवऱ्याच्या हातात स्वत:च काठी देत असे. तिसऱ्या खेपेला गरोदर असताना, ‘पाठीवर मारा पण पोटावर मारु नका. पोटात पोर आहे’ असं काकुळतीनं सांगूनही तो राक्षस ऐकत नव्हता.

एकदा सावित्री मावळतीच्या पडवीत तान्ह्या मुलीला बोंडल्याने दूध पाजीत होती. तिला शोधीत जाऊ पाय आपटीत आली. दूध कमी पडलं दूध आणण्यासाठी घरांत जाणार तोच ‘अगोबाई राजकन्येला दूध पाजणं चाललंय वाटतं. वाहता आहेत ना घरात दुधाच्या नद्या त्या बैलोबाला ताळ्यावर आणायला तुला घरी आणली, काय केलस घरांत येऊन ? आला कां तो पोळ वठणीवर? मी म्हणते तुझ्यासारख्या बाईला हवीत कशाला पोरंबाळं ? इतके दिवस एका रिकामटेकड्या पोळाला पोशीत होतो. नंतर तू जोडीला आलीस. आता तर पोरांची फलटणंच लागली. तुझ्या नवरोबाला जरा विचार म्हणांवं. काय तर काहीच करीत नाहीस. पण घरातल्या वस्तू तरी जाग्यावर ठेव. काय करणार ? सणावारी अंगावर दागिनेसुद्धा घालता येत नाहीत. ठेवले आहेत माहेरी. नाही तर हा दरवडेखोर ते सुद्धा चोरून न्यायचा.’

“जाऊबाई, मी करत्येना घरात दिवसभर काम. आणखी काय करु मी ?”

“काय करु? अगोदर ही पिलावळ वाढवणं बंद कर. तो एक निर्लज्ज पण तू कशाला घेतेस त्या राक्षसाला जवळ ?”

सावित्रीचा तोल गेला. पोरीला जमिनीवर आपटून ती वेगाने माजघरांत गेली. आकडीवरची कोयती घेऊन पडवीत आली. पदर सावरीत कोयती जावेच्या हातात देत फुत्कारली.

“घ्या जाऊबाई ही कोयती घ्या आणि पोरींची मान चिरुन टाका. त्यानी समाधान नाही झालं तर माझी पण मान चिरुन टाका. मी जाईन नरकात. पण पोरं नको. कोणा मोठ्या घरात जन्म घेईल. तुम्ही सुटाल आणि त्या पोरीलाही वाट मोकळी होईल. चमचा दोन चमचे दुधानी काय तिचं पोट भरणार? म्हणून घरात जाणार होते दूध आणायला.”

जाऊबाईनी कोयती खळ्यात भिरकावून दिली. या अनपेक्षीत घटनेनी ती थरथर कांपत होती.

“अग्गो सावित्रे काय समंध बसलाय का तुझ्या मानगुटीवर ? काय करत्येस काय ? तुझ्या नवऱ्यने आमचा उभा दावा साधलाय. आता तू पाठव आम्हाला तुरुंगात. देत्ये बाई दूध देत्ये हो तुझ्या पोरीला. चांगलं लोटीभर दूध पाज हो हिला.”

सावित्रीच्या नव्या अवताराने सारं घर ढवळून निघालं. कोयत्या, विळ्या लपवल्या गेल्या. तिच्यावर होणारी शिव्यांची लाखोली अचानक बंद झाली. पण घरांत कुजबुज वाढत होती.

एका करंट्या संध्याकाळी सावित्री म्हशीची धार काढीत होती. लोटीभर दूध काढून सुद्धा पोरीला बोंडलंभर दूध देताना बोलणी खावी लागतात याची खंत तिला सतावीत होती. एवढ्यात माजघरांत गलका झाला. रडारड कानावर येताच सावित्रीने म्हशीची कांस सोडली.

लोटी तशीच गोठ्यात टाकून ती तिरासारशी माजघरांत घुसली.

सावित्रीचा नवरा तडफडत होता. अंगाला आळेपिळे देत हातपाय झटकत होता. चेहरा काळाठिक्कर पडला होता. दीर, जावा आजूबाजूला पहात रडण्याचा वेग कमी जास्त करीत होत्या.

सावित्री मटकन् खाली बसली. पोरी तिला बिलगल्या. जावा मानभावीपणाने तिची समजूत घालू लागल्या.

"पोरी सावित्री, काय बाई दैव तुझ्या पाठीशी लागलंय. तू काम कर म्हणून नवऱ्याच्या पाठीशी होतीस म्हणून कधी नव्हे तो आज तो लाकडाची सळप रचून ठेवत होता. तेवढ्यात जनावर त्याला डसलं. घाबरु नकोस. माश्यातेल्याला निरोप धाडलाय. आत्ता येईल तो. मोठ्ठा मांत्रिक आहे तो."

मांत्रिक आला. त्याने नाडी बघितली डोळे तपासले आणि आणलेली विभूती बटव्यात परत टाकीत हात हलवीत म्हणाला "इतका वेळ काय तमाशा पहात होतात ? आता बोलावून काय उपयोग ? पक्षी पिंजरा सोडून केव्हांच गेला."

तेराव्याला लाडवावर हात मारीत गावकरी कुजबुजत होते. 'कसलं किरडू आणि कसलं काय? एक तरी दाताचा वण होता कां त्याच्या पायावर' उगीच तमाशा. जहर घातलं होत त्याला घरच्यानी दुसरं काय?

सावित्रीच्या दिरानी तेरावं आटोपल्यावर पंचाना बोलावून घेतलं. सावित्रीच्या नवऱ्याची किती उसनी फेडली. त्यानी किती चोऱ्या केल्या याचा हिशोब पंचांपुढे मांडला. आणि सरतेशेवटी मिळकतीला आपला हिस्सा त्याने कसा गमावला हे स्पष्ट केलं.

पण पंच माणुसकीला पारखे झाले नव्हते. घरात रात्रंदिवस गुरासारख्या राबणाऱ्या सावित्रीला मिळकतीमधला काही भाग मिळालाच पाहिजे असा आग्रह त्यानी धरला. अखेर घराच्या उत्तरेला असलेला जमिनीचा लहानसा तुकडा तिला देण्यात आला. घरच्या विहीरीचा उपयोग करण्याचा अधिकारसुद्धा सावित्रीला पंचांच्या आग्रहामुळे मिळाला.

पंच निर्णय देऊन कागदपत्रावर साक्षीदार म्हणून सह्या करुन उपरणी झटकत निघून गेले. दुपार टळून गेली होती. सावित्री उगवतीच्या पडवीत पुतळ्या सारखी उभी होती. दोन मुली तिला बिलगून होत्या. धाकटी तिच्या कडेवर होती. भरलेल्या घरांत ती एकटी झाली होती.

आशेचा एकही किरण दिसत नव्हता. जमीन मिळाली. पण राहणार कुठे ? कसे ? अगदी छोटसं घर बांधण्याचीसुद्धा तिची ऐपत नव्हती. तिचा स्वाभिमान तिला दुसऱ्या घराचा आश्रय घेण्यापासून परावृत्त करीत होता. अंगावरचे दोन डाग नवऱ्याने केव्हाच ओरबाडून नेले होते. राहता राहीला मंगळसूत्रातला सोन्याचा मणी. तोही नवऱ्याबरोबर स्मशानात गेला. घराचा, घरातील माणसांचा संबंध तूटून गेला होता.

दोन्ही मुली सावित्रीला गदगदून हलवीत होत्या. सावित्री भानावर आली. घरांत जाऊन मुलींचे, तिचे कपडे सासरी येताना आणलेल्या लोखंडी ट्रंकेत भरले. देवापुढे हात जोडून मनोभावे प्रार्थना केली पोरीना घेऊन, डोक्यावर ट्रंक घेऊन सावित्री खळात आली. पाठ वळवून घराला न्याहाळून घेतलं आणि सावित्री अंगण ओलांडून गेली.

सावित्रीचा नवा संसार सुरू होणार होता. सर्वस्वाला मुकलेली सावित्री तिच्या जमिनीच्या तुकड्याकडे वळली. वांझपणाचं दुःख झेलीत उभ्या असलेल्या आंब्याच्या झाडाकडे तिची नजर गेली. झाडाखाली येऊन तिन डोक्यावरची ट्रंक जमिनीवर ठेवली. पोरीना ट्रंकेवर बसवलं. झाडाखाली खूप पातेरा सांठला होता. सावित्रीनं सर्व जागा साफ केली. झाडाची पानं जोरानी सळसळली. क्षणभर सावित्रीला वाटलं झाड जणू तिच्याशी कुजबुजलं. त्याही परिस्थितीत तिला हसू फुटलं. पावलांचा आवाज आला. सावित्रीकडे गांवाचे सरपंच येत होते.

"सावित्री, कागदपत्र करुन मी घरापुढे वळलो. पण पावलं अडखळत होती. न्यायनिवाडा करण्याच्या घाईत. तुला घराबाहेर काढायला तुझ्या दिराना मदत तर केली नाहीनां या विचाराने कांपरे भरले. पोरी तू माझ्या मुलीएवढी. तूला नाही सासर. नाही माहेर. या जगात तूला कोण विचारणार ? ए! बघ माझे ऐक. माझ्या घरी चल. काही संकोच बाळगू नकोस. माझी मुलगी भर संसार सोडून गेली. शेवटपर्यंत तिची कूस उजवली नाही. देवानी माझ्या सखूला अगदी पोरीबाळींसह परत धाडली असं समजेन मी. बरं ते पसंत नसेल तर मागच्या पडवीत बिऱ्हाड कर. लागलं सवरलं तर आम्ही आहोत ना."

"दादा, परत पाठी फिरून तुम्ही माझ्याकडं आलात माझी विचारपूस केलीत. यातच सर्व काही आलं. दादा मी कमनशीबी. माझ्या सावलीनं तुमचं घर विटाळून जाईल. हा जमिनीचा तुकडा हेच माझ जग. दादा तुमचा मान राखून सांगत्ये, काही लागलं सवरलं तर नक्की मी तुमच्या दारात येईन. घेतली मदत चांगले दिवस आल्यावर नक्की परत फेडीन."

"सावित्री, चांगले दिवस येतील म्हणत्येस? येऊं देत खुशाल येऊं देत. पण तुझ्या पदरात तीन मुली आहेत कुणाचीही अगदी आपल्याला आदर वाटत असलेल्या माणसाकडून सुद्धा मदत घ्यायची नाही. हा हट्ट चांगला नाही. माझं ऐक संसार उभा करायला तेवढी कमीत कमी मदत लागेल तेवढी मदत करण्याची माझी इच्छा आहे. चांगले दिवस आल्यावर तुला पटेल त्या मार्गानी तू परतफेड कर. इच्छा नसताना सुद्धा तुझा मान राखण्यासाठी मी ती स्विकारीन."

"दादा माझे बाबाच तुमच्या मूखातून बोलले मी नाही कशी म्हणू."

माडाची झांपं. बांबूच्या कामट्या वगैरे अगदी शुल्लक सामान घेऊन सावित्रीने झोंपडी उभारली. लोकांकडे धुणीभांडी, सैपाक करुन संसार रेटू लागली. सावित्रीच्या तिन्ही मुली नक्षत्रासारख्या सुरेख होत्या. परिस्थितीमुळे नको तितक्या समजूतदार होत्या. त्यांचं कोमजलेलं बाळपण पाहून सावित्रीचा जीव तिळ तिळ तुटत असे.

दिवाळीचे दिवस होते. घराघरातून आनंदाला उधाण आलं होतं. काम करीत असलेल्या घरांतले लोक दिवाळीच्या निमित्ताने गोडधोड देतील म्हणून सावित्री चार दिवस कोणत्याही घरी गेलीच नाही. मुलींनासुद्धा कोणाकडे पाठविले नाही.

भाऊबीजेचा दिवस उजाडला. ओवाळायला सख्खा भाऊ नव्हता. गरीब बहिणीनी एखाद्याला भाऊ मानला. तरी कोण तयार होणार तो मान स्विकारायला ? सावित्री रड रड रडली. शेवटी कसला तरी निश्चय करून उठली. त्यातल्या त्यात बरं दिसणारं पातळ नेसली. तबकात निरंजन तेवत ठेवलं आणि आंब्याच्या झाडाखाली आली.

सावित्रीचा कंठ दाटून आला. थरथरत्या हातानी तिने आंब्याला-सावित्रीच्या मोगरांब्याला मनोभावे ओवाळलं.

तबक झाडाखाली ठेऊन सावित्रीने वांकून झाडाला नमस्कार केला.

"मोगऱ्या, मला जगात कोणीच नाही रे. भाऊबीजेला मी कोणाला ओवाळू ? आता तूच माझा जीवाभावाचा भाऊ. पोरीबाळीना घरांत ठेऊन मी कामाला जाते. तुला बजावून सांगून जाते. मोगऱ्या,

माझ्या पोरीबाळींना तू सुखरुप ठेवलंस रे बाबा. हे बघ मोगऱ्या, मी कोणापुढे हात पसरले नाहीत पण तुझ्यापुढे हात पसरते. बघ मी तुला बहिणीच्या प्रेमाने ओवाळलं. तू माझ्या पाठी रहा. तू कोणतीही ओवाळणी घाल. मी आनंदाने घेईन.''

कोणत्याही झाडाची पिकल्यावर किंवा रोगराईने पान गळतात. मोगरा सळसळला. सावित्रीच्या तबकात हिरवी गार पान अलगद पडली.

देठ तोडून पानं काढावीत तशी ती हिरवीगार पानं पाहून सावित्री भारावून गेली.

''मोगऱ्या, मला तू पानाची ओवाळणी घातलीस. खरंच मला ती लाखमोलाची आहे. कुडीत जीव असेपर्यंत मी तुझी ओवाळणी जपून ठेवीन.''

दिवाळी संपली. टिपऱ्या पौर्णिमेला त्रिपुर उजळून निघाले. सुरुवातीला गुलाबी वाटणारी नंतर बोचकारे काढणारी थंडीची झळ पसरत होती. गावोगावच्या झाडांना मोहोर फुलून येत होता. आणि एक चमत्कारच घडून आला. वांझ मोगऱ्याची फांदीन् फांदी मोहोरानी फुलून गेली. अशा बातम्या वणव्यासारख्या पसरत जातात. सावित्रीच्या वांझ आंब्याला अचानक आलेला मोहोर पाहण्यासाठी गावकऱ्यांची झुंबड उडाली. काही अतिउत्साही गावकऱ्यांनी मोहोराचे दाणे आपल्याबरोबर नेले. गावच्या माहेरवाशीणी सासरच्या आणि आसपासच्या लोकांना घेऊन कौतुकाने येऊ लागल्या.

थोडक्यात सावित्रीचं झोपडं आणि सावित्रीचा मोगरांबा पंचक्रोशीचा एक कौतुकाचा नव्हे श्रद्धेचा विषय झाला होता.

नातेवाईकांच्या, वडील माणसांच्या प्रेमाला, कौतुकाला पारख्या झालेल्या सावित्रीवर प्रेमाचा, आपलेपणाचा हितचिंतनाचा वर्षाव होऊ लागला. सावित्रीला हा एक नविनच अनुभव होता. दारिद्र्याच्या वैशाख वणव्यात सावित्री, एकटी सावित्रीच, तिच्या मुलींवर जमेल तेवढा कौतुकाचा अगदी हंसरा चेहरा ठेऊन शिडकावा करीत होती. शाब्दिक का होईना त्यांचे लाड करीत होती. पण तिच्या मोगरांब्यानी कात टाकली आणि तिच्या ओवाळणीला जागून सावित्रीला सुखाच्या सावलीत नेऊन सोडलं.

ऋतुचक्राबरोबर सावित्रीचे दिवस सुखाच्या अपेक्षापूर्तीच्या पायऱ्या ओलांडीत भराभर निसटून जात होते. मोगरांबा वर्षानुवर्ष ओझ्यानी फळं देत होता. अविरत श्रम करुन सावित्रीने आदर्श संसार केला. मुली जात्याच हुशार असल्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला नाही. मोठी मुलगी तिच्या कॉलेजच्या प्रोफेसरांच्याच प्रेमात पडली. आणि लग्नानंतर पाठच्या दोन्ही बहीणींचे प्रश्न तिने नवऱ्याच्या मदतीने सोडवले.

सावित्रीच्या झोपडीच्या ठिकाणी साधं पण टुमदार घर उभं आहे. एका दिवाळीला तिचे तिन्ही जावई सावित्रीचा पाहुणचार घेऊन घरी परतताना सावित्रीला आग्रह करु लागले.

''हे पहा आई, आता तुमच्या तिन्ही मुली सासरी नांदताहेत. तुमचंही वय झालय. तुम्ही ठरवाल त्या मुलीकडे आता उरलं आयुष्य सुखात, आरामात काढणं चांगलं नाही कां ?''

''जावयाच्या घरी राहण्याचा प्रसंग येऊ नये या मताशी मी मुळीच सहमत नाही. माझ्या मुली मुलांपेक्षा उजव्या आहेत. पण काय करु? माझे पाश इथे गुंतलेत''

''पाश ? कसले पाश आई?''

''प्रेमाचे पाश हो माझा लाडका भाऊ माझ्याबरोबर असतो त्याला मी कधीच अंतर देणार नाही.''

''भाऊ? मी कधीच त्याला पाहीलं नाही. लग्नातसुद्धां दिसला नाही. तुमच्यावर अवलंबून आहे म्हणता. म्हणून तुम्हाला घर सोडवत नसणार. आई तुमच्या आशिर्वादाने तुमचे तिन्ही जावई अगदी सुखात आहेत. उत्तम पैसा बाळगून आहेत. सर्वांच्या ऐसपैस जागा आहेत. आई बरोबर मामा आले तर आम्हाला अधिकच आनंद होईल.''

''हा तुमचा मोठेपणा आहे. पण माझा भाऊ पांगळा आहे. त्याचे पाय जमिनीत खूप रुतले आहेत. कसा येणार तो माझ्याबरोबर?''

''जमिनीत पाय रुतले आहेत ....?''

पुढचं वाक्य बोलण्याअगोदरच सावित्रीची मुलगी म्हणाली,

''अहो तुम्हाला नाही उलगडणार ते कोडं. आईचा भाऊ म्हणजे कोपऱ्यातला मोगरांबा हो. आम्ही बोलून बोलून थकलो. ती कोणाचं ऐकणार नाही. म्हणते यमदूतच त्यांची फारकत करेल.''

आणि खरोखरच तेच प्रत्यक्षात उतरलं. सुंठीसारखी सडसडीत सावित्री अंगण झाडताना भोवळ येऊन पडली. कशीतरी धडपडत मोगरांब्याखाली गेली. मोगरांब्याला कवेत घेता घेता कोसळली आणि तिचे प्राणपक्षी क्षणार्धात देहाची कुडी सोडून निघून गेले.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे एखादा रोग जडावा तसा मोगरांबा दिवसेदिवस सुकू लागला. मोहरत्या दिवसांत एकाही फांदीवर मोहोर दिसला नाही. श्रावणातल्या धुमश्चक्रीत विज मोगरांब्यावर कोसळावी तसा मोगरांबा बघता बघता उमळून पडला. वाऱ्याचा वेग प्रचंड होता. मुसळधार पाऊस पडत होता. विजा चमकून होत्या.

मोगरांबा कोसळल्याची बातमी आगीसारखी पसरली. गावकऱ्यांची उस्फूर्त सभा झाली. मोगरांब्याच्या जागी पार बांधण्यात आला. एरवी वृक्ष जिवंत असताना पार बांधतात. मोगरांब्याला जिवंतपणी तो मान मिळाला नाही.

अजूनही तो ढासळता पार आहे. लोक सावित्रीच्या मोगरांब्याचा पार म्हणून त्याची ओळख करुन देतात. -०-

## सदस्य-संवाद

सी. गो. खांबेटे, सहसंपादक

स. न. वि. वि.

हितगुजच्या माध्यमातून आपल्याशी संपर्क साधण्याचे अनेक नवनवीन प्रयोग आम्ही केले. अंक क्र. ६८: डिसेंबर २००६ पासूनचा हा सातवा त्रैमासिक हितगुज. १२ ते १६ पानांऐवजी हे सर्व २४ पानी हितगुज सुमारे १००० सदस्यांकडे प्रत्यक्षपणे व अमर्याद व्यक्तींकडे एका इंटरनेटच्या क्लिकने उपलब्ध करता आले. कारण हे सर्व **www.marathepratishthan.org या** आपल्या वेबसाईटवर 'मुखपत्र' या सदरावर क्लिक करून कोणीही वाचू शकतो. ते पीडीएफ मध्ये असल्यामुळे आता आपणास फॉंटची सुद्धा जरूर भासत नाही. यामागचा हेतु असा की नवीन संगणक-दोस्तीच्या तरुण पिढीला सुद्धा आपल्या या कार्याचा परिचय व्हावा.

आता यापुढे आपल्या कुलवृत्तांताविषयी. मागील अंकात जाहीर केल्याप्रमाणे कुलवृत्तांताच्या सुमारे ४५० पानांची म्हणजे पहिल्या ६१ घराण्यांची डाटा एंट्री आमचेकडे उपलब्ध आहे. म्हणजे या पैकी कोणालाही आम्ही मागणीप्रमाणे संबंधित पाने इ-मेलने विनामूल्य पाठवू शकतो. त्यामध्ये नवीन माहितीची भर घालून आपण आमचेकडे पाठविणे अपेक्षित आहे. तसेच ज्याना शक्य आहे त्यानी आपले लेखन देवनागरीमध्ये पाठवावे. सध्या सौ. राधा मराठे, पुणे व सौ.मंगला मराठे,गोरेगांव यांचा मराठी मजकूर इ-मेलने मिळतो. इतरांनीहि प्रयत्न करावयास हरकत नसावी. युनिकोड फॉंट वापरुन कोणालाही देवनागरीचा वापर करता येतो. याबद्दल विस्तृत माहितीपूर्ण खास लेख पुढील अंकात वाचा. हितगुजमध्ये नवनवीन विषय हाताळावयास सुरुवात केल्यापासून उत्तेजक प्रतिक्रिया येत आहेत. 'रिव्हर्स मॉर्टगेज कर्ज योजने'च्या माझ्या लेखाच्या उपयुक्ततेविषयी सौ. राधा मराठे यांनी इ-मेल केल्याबद्दल धन्यवाद. तसेच मुलुंडच्या महेश मराठे यांनी काही मराठे मंडळींचा शोध घेऊन त्यांना सदस्य करून घेण्याविषयी लिहिले आहे याबद्दल त्यांचे अभिनंदन.

कळावे. आपला सी. गो. खांबेटे.

# माहेरच्या अंगणात

**सौ. उर्मिला श्रीनिवास मराठे** (पूर्वाश्रमीची नलिनी ना. बापट) पृष्ठ क्र. ३८८
दख्खन पाटबंधारे सोसायटी, त्रिवेणी नं. १/६, ३६/९ एरंडवणे, पुणे - ४११०३८. फोन : ०२०- २५४६४७०६.

माहेरच्या अंगणात हे हितगुज मधील सदर वाचता वाचता मी माझ्या मनातील माहेरच्या गावात कधी पोहोचले ते कळलेच नाही आणि मग त्या गावात ५०-५५ वर्षापूर्वी घालविलेले सुखद दिवस आठवले आणि माझे मन हळूच त्या गावात शिरले.

*गाव माझ्या मनातलं,*
*सदैव आठवणीत जपलेलं*
*स्वरूप जयाचे असे*
*ओबडधोबड अन् खडकाळ*
*परी अंतरंगी तयाच्या*
*लपलंय एक प्रेमळ आभाळ.*

असे हे गाव म्हणजे एक छोटेसे खेडेगाव "मालघर." रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील चिपळूण पासून ८ मैलांवर असलेले हे माझे माहेर, खरं तर हे माझ्या वडिलांचे गाव. ह्याच गावात मी माझ्या लहानपणी अनेक सुटट्यांचे दिवस घालवले. रूढ अर्थाने हे माझे माहेर म्हणता नाही येणार. कारण माझे आईवडील या गावात कायमचे कधी राहीले नाहीत. वडिलांची साधारणपणे तीन वर्षांनी बदली व्हावयाची आणि आम्ही नवनवीन गावात जावयाचो. मग नवीन मैत्रिणी, नवी शाळा असे चक्र चालू असायचे. पण असे असूनसुद्धा दर दिवाळी मे महिन्याच्या सुट्टीत आई आम्हा मुलांसह मालघर मुक्कामी यावयाची. यामुळे तिथल्याच अनेक आठवणी माझ्या मनांत भरून राहिल्या आहेत. प्रथम आठवते ते आजोबांचे साधे कौलारू, पडवी-माजघर-ओटी असलेले, चंद्रमौळी घर. घरासमोरचे भरपूर मोठे शेणाने सारविलेले स्वच्छ अंगण आणि अंगणातला मन झुलविणारा झोपाळा, दूरवर पसरलेले शेत आणि वर शुभ्र निळे आकाश, परसदारी आजीने स्वतः बनविलेले तुळशीवृंदावन, त्यातील तुळस आणि बाजूला ठेवलेला नंदीबैल. असे हे तुळशी वृंदावन आणि त्यापुढे काढलेली सुरेख रांगोळी. ह्या रांगोळीचे वैशिष्ट्य म्हणजे ती भाताच्या तुसापासून घरीच बनविलेली असायची. ह्या अंगणात पाऊल पडले की, एकदम प्रसन्न वाटायचे. 1BHK / 2BHK अशी घराची ओळख असणाऱ्या मुलांना अंगण ह्या शब्दांचा अर्थ आणि आनंद कसा जाणवेल कोण जाणे ?

या घराच्या आठवणींमध्ये प्रथम आठवण येते ती धारदार नाकाच्या करारी आजोबांची आणि डोळ्यापुढे उभी राहते एक डोक्याला फेटा बांधलेली, आखूड धोतर नेसलेली आणि बाराबंदी घातलेली उंच मूर्ती. कोकणातल्या खडकाळ,डोंगराळ भागातून चालावयाचे म्हणजे काठीचा आधार घ्यावा लागतोच. शिवाय स्वसंरक्षणासाठीही तिचा उपयोग होतो. त्यामुळेच काठी आपटीत सतत ताठ चालणारे आजोबा आजही आठवतात.

आमचे घराणे भिक्षुकांचे. आजोबा आजुबाजूंच्या पंचक्रोशीत पूजा सांगावयास, लग्न लावण्यास जात असत. आजोबा पूजा सांगून आले की, येताना सत्यानारायणाचा प्रसाद घेऊन येत. आम्ही मुले जेव्हा तेथे जमत असू तेव्हा सर्वांचे लक्ष आजोबा कधी येतात आणि प्रसाद कधी मिळतो इकडे असावयाचे. कधी कधी ते स्वतः देखील प्रसाद बनवायचे. तो इतका चविष्ट बनायचा की, आज भरपूर साजूक तूप घालून केलेला आपला शिरा त्यापुढे फिकाच पडावा. कदाचित् त्यात आजोबांच्या हाताचा गोडवा उतरत असावा. कारण काही असो, आजसुद्धां त्या प्रसादाची चव जिभेवर रेंगाळत आहे. खरं म्हणजे आमच्या हातावर एक एक चमचाच प्रसाद मिळायचा. पण त्यात भरपूर सुख, समाधान आणि आनंद सामावलेला असायचा.

ह्या प्रसादावरून एक गोष्ट आठवली. त्या काळी गावोगाव फिरून कल्हई लावणारे कल्हईवाले आणि बांगड्या भरणारे कासार रात्रीच्या वेळी एखाद्या गावात एखाद्याच्या घरी मुक्काम करीत. त्या दिवशी असेच आमच्या घरी कल्हईवाले मुक्कामाला होते. घरी आजोबांनी सत्यनारायणाची पूजा ठरविली होती. तेव्हा मी असेन ५-६ वर्षांची. पूजा संपल्यानंतर देवापुढे ठेवण्यासाठी आईने आम्हाला एक भोकाचा पैसा दिला होता. पूजा होऊन आरती सुरु झाली. आरती चालू असताना एकीकडे माझे त्या पैशाशी खेळ करणे चालू होते. खेळता खेळता करंगळी जवळच्या बोटात पैसा रुतून बसला. तो काही निघेना. मी जोरात रडू लागले. सर्वजण तो पैसा ओढून काढायचा प्रयत्न करु लागले. त्या नादात बोट भले मोठे सुजले, रक्ताळले. पण पैसा रुतलेलाच. शेवटी त्या कल्हईवाल्याला काहीतरी सुचले. त्या 'अनामिक' कल्हईवाल्याने त्याची भली मोठी कात्री घेऊन ते पैसा अलगदपणे कापून काढला. आणि माझे बोट फारशी इजा न होता मला परत मिळाले. त्या अनामिक कल्हईवाल्यामुळे माझी अनामिका मला परत मिळाली. आणि दुःखाची भरपाई म्हणून आजीने भरपूर प्रसाद खावयास दिला.

आमची आजी अतिशय शांत आणि अबोल होती. आजही आठवते ती तिच्या स्वयंपाकाची रुचकर चव. आजोबा महादेव आणि आजी पार्वती. आजोबा नावाप्रमाणे रागीट, तापट. आजी अतिशय शांत. तिला कामाशिवाय बसलेली मी कधी पाहिले नाही. त्या काळी आजच्याप्रमाणे स्वयंपाकासाठी गॅस नव्हता. इतकेच काय पण आमच्या घरी स्टोव्हसुद्धा नव्हता. सर्व स्वयंपाक चुलीवर आणि सोवळ्यात करावा लागे. आजी ते सर्व करी. तसा स्वयंपाक साधाच म्हणजे भात आमटी भाजी किंवा उसळ असा असावयाचा. कोकणात त्यावेळेपर्यंत गहू खाण्याचे प्रमाण जवळजवळ नव्हतेच. "मिठाणे" म्हणून एक प्रकार आजी करावयाची. मिठाणे म्हणजे पावटे भाजून केलेली आमटी. त्या अन्नाला एक अवीट गोडी होती. कां कोण जाणे नुसता भात आणि ती आमटी आम्ही ओरपून खावयाचो. जणूं काय श्रीखंड पुरीच. कधी कधी कोळाचे पोहे, करडीची भाकरी, खमंग मिरची असावयाची. पण भात आमटी खरी. आणि तीही आजीच्या हातची.

जेवणावरून आठवले. आमच्या घरी एक शिस्त होती. त्याकाळी जेवणासाठी ताट वाटी नसायची. पत्रावळ आणि तीसुद्धा प्रत्येकाने आपापली लावलेली असावयाची. घराच्या मागील डोंगरावर आंब्याची, फणसाची, वडाची अशी बरीच झाडे होती त्यातल्या वडाच्या झाडाची पाने तोडून आणावयाची व पत्रावळ बनवायची हे काम मुलांकडे असावयाचे. वडाची पाने एकमेकांना खराट्याच्या काड्यांनी जोडून पत्रावळ कशी बनवायाची हे आम्हाला आजोबांनीच शिकविले होते. पत्रावळ लावल्याशिवाय जेवावयास मिळायचे नाही ही शिस्त होती. आणि मला हे फारच अवघड वाटायचे. माझ्या चुलत बहिणी तीन चार पत्रावळी लावायच्या तेव्हा कोठे माझी एक पत्रावळ लावून व्हावयाची. तसेच आणखी एक शिस्त म्हणजे जेवण झाल्यावर जमिनीवर मुलींनी शेणगोळा फिरवून जमीन स्वच्छ करणे हेही काम मला अजिबात आवडायचे नाही. पण बोलायची काही सोय नव्हती. आम्ही मुले आणि आजोबा एकाच पंगतीला बसायचो. मोठ्या बायका वाढण्याचे काम करीत. जेवतांना काही मागावयाचे नाही. समोर पदार्थ आला की, फक्त हो किंवा नाही म्हणावयाचे. जास्त बोलायचे नाही. जेवताना मचमच असा आवाज करावयाचा नाही. अगदी शांतपणे लक्ष देऊन जेवायचे. आज ही शिस्त आठवली की, तिचे महत्व

पटते.

कोकणातली आणखी एक आठवण म्हणजे करवंदाच्या जाळीत शिरून पानापानाखाली दडलेली करवंदे शोधून खाण्यातली मजा. करवंदे घरी आणून धुवून खाणे वगैरे काही माहीतच नव्हते. जाळीतली करवंदे खांताना त्याचा चीक तोंडाला लागायचा. ते चिकट हात फ्रॉकलाच पुसायचे. मग आई ओरडायची. पण ती मजा खरंच काही और होती. तसाच घराच्या मागच्या अंगणात एक आंबा होता. त्याचा आंबा सुपारीएवढा असायचा. म्हणून तो सुपारी आंबा. त्याची चव इतकी अप्रतिम होती की, कितीही खाल्ला तरी अजून खावा असे वाटायचे.

अजूनही आठवतायत ते अंगणातल्या झोपाळ्यावर बसून घेतलेले उंच झोके आणि म्हटलेली गाणी. साधा लाकडी फळीचा अंगणातल्या मांडवाला सुंभाने करकचून बांधलेला झोपाळा. त्यावर आम्ही दहा-बारा मुले बसून मजेत झोका घ्यायचो. गाणी म्हणायचो. भेंड्या खेळायचो. आमची एक काकू फार छान गाणं म्हणायची. आम्ही सर्वजण तिला फार आग्रह करून गाणं म्हणायला लावायचो. दिवस असा आंबे खाण्यात, करवंदे खाण्यात, गाणी म्हणण्यात केव्हांच संपायचा. हो , ह्यात एक महत्वाचे काम असावयाचे पाणी भरण्याचे. विहीरीवरून पाणी आणून घरात भरून ठेवायचे. घरातील मोठ्या बायका हे काम करीत. आम्ही त्यांना थोडीफार मदत करीत असू.

मला आवडणारे ह्या वास्तव्यातले एक काम म्हणजे परसदारी असलेल्या बागेतून फुले व तुळशी आणून देवपुजेची तयारी करणे. आमच्या घराशेजारी आमडेकर काकूंचे घर होते. त्यांच्या परसदारी खूप मोठी बाग होती. निरनिराळी फुले तोडणे हा माझा आवडता छंद होता. या काकूंच्या बागेत रहाटाची विहीर होती. ह्या विहीरीवरच्या पन्हळ्यातून झुळूझुळू वाहत जाणारे पाणी पाहतांना आणि रहाटाच्या कुई कुई असा आवाज ऐकतांना मन प्रसन्न व्हावयाचे. आजच्या मुलांना परसदार रहाट, विहीर ह्या गोष्टी पहावयास मिळत नाहीत. तो आनंद त्यांना मिळू शकत नाही.

कोकणातील हे सुट्टीचे दिवस असे भुर्रकन संपायचे आणि सुट्टी संपली की, आपल्या नेहमीच्या गावी (शहरी) परत फिरायचे. पुढील आयुष्याच्या दृष्टीने परत जाणे भागच असायचे. कोकणातील निसर्गाच्या सान्निध्यात खुल्या आणि मोकळ्या आकाशात निश्चिंत मनाने घालविलेले ते दिवस आठवले की, आजही मनाला हुरहुर लागते आणि वाटते ते दिवस पुन्हा कधी अनुभवता येतील का?

माहेरचे अंगण म्हटल्यावर ते आजोबांचे खेड्यातील कौलारू घर आठवले. हे घर म्हणजे भिक्षुकाचे घर. त्यात सुबत्ता ती किती असणार? पण आहे ते सर्वांनी मिळून आनंदाने आणि सुख समाधानाने खावे ही शिकवण मला त्या माहेरच्या अंगणातच मिळाली. माहेरचे अंगण म्हटल्यांवर मन कुठेतरी जागं झालं आणि त्या घराची सय आली. आणि नजरेसमोर हे अंगण साकारले. मनाने पळत जाऊन त्या कौलारू घरात शिरले. मुक्त मनाने सगळीकडे फिरले आणि ते आनंदाचे दिवस परत जणू अनुभवले.

-०-

***(माझी संगीत वाटचाल-पृ. ११ वरून )*** अशी थोडीशी सुधारित आवृत्ती. काव्यगायनानंतर भावगीतगायन आलं आणि ते जनमानसांत रुजवलं प्रामुख्यांनी बबनराव नावडीकर आणि गजानन वाटवे यांनी. अशा प्रकारे कधी गाण्याविषयी तर कधी कवींविषयी तर कधी चालींविषयी निरुपण करीत कार्यक्रम होतो. गाणी १९४०/४५ पासून ते १९८० च्या दरम्यानच्या काळातली असतात.

**५.रंग लावणीचे:**

लावणी व तिचे रंग. आता कोणी म्हणेल की लावणी म्हणजे काय चित्र आहे कां त्यांत वेगवेगळे रंग असायला? तर हो! लावणी हे एक चित्रच आहे. या चित्राला कॅनव्हास आहे शब्दांचा आणि रंग भरलेत सुरांचे, भावभावनांचे. तर अशी ही लावण्यांची वेगवेगळी चित्रं आणि त्यांतले रंग डोळ्यांनी पाहण्याऐवजी कानांनी ऐकता येतात. या लावण्यांचा इतिहास खूप मनोरंजक आहे. कारण या बाजाला सामाजिक, राजकीय परिस्थितीचं भान आहे. आणि त्या त्या वेळच्या गरजेनुसार ती घडत गेल्येय. या लावण्यांचा मागोवा घेतल्यास असं लक्षांत येतं की या मुख्यतः लोकरंजनासाठी रचल्या गेल्या, त्या जनसमूहासमोर म्हटल्या जात आणि त्यांची रचना बहूतेक आठ मात्रांच्या पद्मावर्तनी किंवा सहा मात्रांच्या भृंगावर्तनी वृत्तांत म्हणजेच ताल / गेय वृत्तांत असायची. लावणे या क्रियापदापासून रचना या अर्थी लावणी - शब्द निर्माण झाला. लावीत गेले की लावणी होते अशी सोपी व्याख्या.

लावणी म्हटल्यावर आपल्या मनांत काही कल्पना येतात त्या म्हणजे शृंगारिक वर्णनं असणारी गाणी, कामुक शृंगार असलेला बाईचा नाच, पदर वर धरून पाठमोरी उभी असलेली आणि नाचत असलेली बाई. या पलिकडे जाऊन खूप काही या लावणीत आहे. ते आपल्यासमोर ठेवावे हा उद्देश आहे. लावणीचे ठळक प्रकार वगाची, बालेघाटी, छक्कड, जुन्नरी, धावती किंवा झडती, हौद्याची आणि बैठकीची. पैकी वगाची लावणी कथा उलगडत जाते, बालेघाटी दमदार परंतु दुःखाची भावना सांगते, छक्कड शृंगाराची कारंजी उडविते, जुन्नरी गद्य मजकूर सांगते पण लयबद्ध असते, हौद्याची वर्णनाला उपयोगी आणि बैठकीची जणू काही ठुमरीला प्रतिसाद ज्यांत वेगवेगळे राग व ताल यांचा वापर आढळतो. यापैकी फक्त वगाची लावणीच आपल्यापर्यंत चित्रपटामधून पोहोचली आहे. बाकीच्या लावण्यांचं काय? म्हणून इतर लावण्यांचे रंगही सांगण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला आहे.

आपला दुसरा गैरसमज असा असतो की लावण्या फक्त स्त्रियाच गातात. आपल्या लावणीसंगीतांत पुरुषांनी गायलेल्या लावण्यांची संख्या मोठी आहे. आपल्याकडे संतकवींनी सुद्धां लावण्या रचल्यात. उल्लेखनीय रचना केलेले आणि लावण्यांत त्यांची मुद्रा असलेले लावणीकार म्हणजे पठ्ठे बापूराव, रामजोशी, प्रभाकर, अनंतफन्दी, परशुराम, होनाजी आणि सगनभाउ. पैकी पठ्ठे बापूराव, रामजोशी, प्रभाकर आणि अनंतफन्दी हे जन्माने ब्राह्मण. घरांत परंपरेने कीर्तनाचा वारसा. पण लावणीसंगीताला राजाश्रय मिळायला, कीर्तन ऐकायला कोणी येईनात. लावण्यांकडे वळलेले शाहीर परशुराम सुद्धा चरितार्थ कसा चालायचा म्हणून कीर्तनं करीत असत. पण त्याना स्वप्नांत दृष्टांत झाला की अभंगरचना पुरे, लावणीकडे वळा म्हणून ते लावणी रचनेकडे वळले. शृंगारिक लावण्या जरी त्यांनी उत्तम रचल्या तरी त्यांचा मूळ पिंड हा अध्यात्मिक होता.

तर असे हे कार्यक्रम आणि त्यांची माहिती. या माहितीवरून कार्यक्रमाच्या दिशेचा अंदाज यावा. कार्यक्रम मनोरंजक तर आहेतच (हे माझं मत नव्हे, तर रसिकांचे) पण माहितीपूर्णही आहेत.

## 'शोध हा नवा- शतजन्म शोधिताना'

सादरकर्त्या- **सौ. मंजिरी मराठे** दादर प.

दूरध्वनी:**०२२-२४४५८६२१/ ९५६९४०८७२**

स्वा. सावरकर यांचा जीवनपट उलगडणारा आणि त्यांच्या अभिजात साहित्यकृतींवर आधारित एकमेव दृक्‌श्राव्य सांगीतिक आविष्कार असलेला वरील कार्यक्रम आपल्या कुलभगिनी, दूरदर्शनवरील सुप्रसिद्ध निवेदिका आणि स्वा.सावरकर स्मारक समितीच्या कोषाध्यक्षा सौ. मंजिरी मराठे उत्तम रीत्या सादर करतात यासाठी त्यांचे खास अभिनंदन.

# जागतिक पर्यावरण दिन -५ जून २००८

-सौ. अरुणा अरविंद मराठे
५५, पवनानगर, चिंचवड गांव, पुणे ४११०३३; दूरध्वनीः ९५२०-२७४५५६१३

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असे संत तुकाराम महाराजांनी सांगून कित्येक वर्षे लोटली पण आता असा जमाना आला आहे की आपण आपल्या सग्यासोयऱ्यांनाच विसरतो आहोत लांब ठेवतो आहोत. मग वृक्षवल्लींना सोयरे मानून त्यांची जपणूक करणे लांबच.

खरं तर वृक्षांचं व मानवाचं नातं फार युगायुगांच आहे मानवाचं जीवनच वृक्षवल्लीवर अवलंबून आहे. भारत हा शेतीप्रधान व निसर्गप्रधान देश आहे. पण पाश्चात्यांचं अनुकरण यांत्रिकीकरण व भरमसाठ रासायनिक वापर यामुळं आपण निसर्गाशी नातं तर ठेवतच नाही उलट अत्याचार करतो आहोत. पर्यावरणतज्ञ सतत आपल्याला जागे करत असतात. पण आपण ही समस्या समजूनच घेत नाही. त्यामुळे आपल्या भावी पिढीला अनेक धोके निर्माण होणार आहेत.

दरवर्षी कोठे तरी पूर कोठे तरी दुष्काळ असतोच. हिरवी जंगले नाहीत त्यामुळे तेथे पाऊस पडत नाही व पाऊस नाही म्हणून झाडे नाहीत असे हे दुष्टचक्र वाढतेच आहे. जो तो राज्यकर्ता आपल्या कारकिर्दीत जास्तीत जास्त जंगलतोड करून आपले खिसे भरतो. यामुळे निसर्गाचे किती नुकसान होते आहे याची चिंता कोण करणार ? उघडे बोडके डोंगर, कोरड्या नद्या,आटलेली तळी, खेड्या पाड्यातून पाण्यासाठी मैलोनमैल चालणाऱ्या बायका पाण्याअभावी सुकलेली पिकं हे सर्व पाहिले की वाटतं, अजून किती पिळवणूक होणार या निसर्गाची व त्याबरोबर आपलीही!

दरवर्षी वेगवेगळ्या कार्यक्रमांतून मंत्र्यांच्या हातून वृक्षारोपण होते. पेपरमध्ये फोटो येतात. पण पुढे या झाडांची देखभाल होते की नाही हे कोणीहि पहात नाही. तसेच रस्त्यांच्या दुभाजकांतील झाडाना काणीहि पाणी घालत नाही. पण त्या त्या ठिकाणच्या नागरिकांनी स्वतःची जबाबदारी समजून त्या झाडांना पाणी घालणे सहज शक्य आहे. प्रत्येक सोसायट्यांतून बिल्डिंग मध्ये गच्चीतून गॅलरींमधून फुलझाडांच्या कुंड्या ठेवाव्या व त्यांची काळजी घ्यावी. झाडांमुळे परिसराचे सौंदर्य वाढते व हवा शुद्ध रहाते. मुलांना वाढदिवसाला महागडी खेळणी देण्यापेक्षा अेक रोप भेट द्यावे. मुले ही रोपे वाढवतील. त्याला फळे फुले आली की त्यांना निखळ आनंद मिळेल. सुट्टीच्या दिवशी नाटके, सिनेमा, टीव्ही यांत वेळ घालवण्यापेक्षा निसर्गरम्य अशा जवळच्या ठिकाणी सहलीस जावे. पावसाळ्यांत रानावनांत दऱ्याडोंगरात वर्षा सहल काढावी. आंब्याच्या कोई, सीताफळ, जांभळांच्या बिया जंगलात पेरून यावे सहलींमुळे कौटुंबिक आनंद वाढेल. दऱ्या डोंगरात हिंडण्यामुळे मुले चपळ व सुदृढ बनतील. अफाट औद्योगिकरणामुळे वायु प्रदूषण, जल प्रदूषण फार वाढले आहे. त्यामुळे डेंग्यू, चिकन गुनिया हे डास संबंधित रोग निर्माण झाले आहेत. या सर्वाचा जर वेळीच विचार केला गेला नाही, जर वेळीच विचार तर भावी भारतीय दुर्बल निपजतील म्हणून आता युद्ध पातळीवर पर्यावरणाचे संरक्षण व्हायला हवे. झाडे लावा, झाडे जगवा, पाणी अडवा, पाणी जिरवा हे मंत्र अमलांत आणायला हवे.

भूनंदनवन म्हणून ज्याचा उल्लेख करतो त्या काश्मिरमध्येही बेसुमार जंगलतोड होत आहे. जागरूक नागरीक म्हणून आपण निसर्गाचं रक्षण करायलाच हवे.

मलेशिया थायलंड सारख्या छोट्या छोट्या देशांत पण औद्योगिक क्रांति झाली आहे. पण निसर्गाचा समतोल सांभाळून. ते लोक कोठेहि रिकामी जागा ठेवत नाहीत. त्या त्या ठिकाणी योग्य दिसेल, शोभेल व वाढेल असे झाड लावतात. रोज लागणारी आले, कढीपत्ता वगैरे झाडे कुंड्यातून छान वाढतात. तुळस तर प्रत्येक घरात हवी. औषधी तर आहेच पण अखंड प्राणवायू देते. गवती चहा सुद्धा कुंडीत असला की सर्दी खोकल्यास उपयोगी पडतो. अेकूण काय ! निसर्ग जपा, झाडे जपा व उदंड फळे खा !

-०-

*(चहाच्या गप्पा -पृ.१३ वरून )*

भाव वाढतील तेवढं उत्तमच. म्हणे श्रद्धा ठेवा " आम्ही तणतणत माघारी वळलो. आम्ही आजींकडे बघितलं. दुकानातला एक देवाचा फोटो त्या आपल्या नातवाला दाखवीत होत्या. त्याच नातवाला श्रद्धा ठेवायला सांगत असणार. आपण उगीच दुकानदारावर चिडलो.!

आम्ही मेडिकल स्टोअर्समध्ये गेलो. ब्लडप्रेशर, डायबेटिस, झोप यासाठीच्या गोळ्या घेतल्या.

"एका महिन्यात वाढले भाव ?" आम्ही त्रागा करीत उद्‌गारलो.

"संयम ठेवा काका. एकदम त्रागा करू नका. सबुरीने घ्या !" आम्हाला शब्द ऐकू आले. पलीकडे दोघे आपापसांत बोलत असावे.

आम्ही फळांच्या दुकानात गेलो. भाव वाढ लेले !" चरफडलो आणि फळं न घेताच निघालो. रागावूनच चालू लागलो.

मागून शब्द ऐकू आले - "संयम, सबुरी, श्रद्धा !"

आम्ही वळून बघितलं - साईबाबा !

"बाबाऽ" आम्ही हाक मारली. बाबा झपाझपा चालू लागले. आम्ही त्यांच्यामागून जाऊ लागलो.

एका झाडाखाली बाबा थांबले.

"बाबाऽ प्रत्यक्ष तुम्ही ?" आम्ही उद्‌गारलो.

"नीट बघ !" बाबा म्हणाले आणि मुखवटा दूर केला. बघतो तर केंद्रीय अर्थमंत्री चिदंबरम !"

"तुम्ही ? तुम्हीच संदेश देत होता मला ?"

"होय !" चिदंबरम म्हणाले.

"अर्थ ?" आम्ही रागानेच विचारलं.

"महागाईला तोंड देण्याची तयारी ठेव !" म्हणंत चिदंबरम अदृश्य झाले.

**सुभाषितसंग्रहः।**

*वहेदमित्रं स्कंधेन यावत्कालविपर्ययः।*
*ततःप्रत्यागते काले भिन्द्यात् घटमिवाश्मनि।।*

-महाभारत आदिपर्व १४०.२१

आपला काळ विपरीत असेल तोवर शत्रूला डोक्यावर घ्यावे. पण अनुकूल काळ आला की दगडावर आपटलेल्या मडक्याप्रमाणे त्याचा चुराडा करावा.

पणजी कै.सौ.यशोदा प्रभाकर मराठे यांच्या स्मरणार्थ
प्रभाकर दामोदर मराठे ८/१३,सहकारनगर, वडाळा-प., मुंबई ४०००३१ ; **सेलः** ९८२० २३२ ०८२
**दूरध्वनीः निवास-**२ ४१५ ०८८९;कार्यालय -२ ४३६ ७०७९;**ई-मेलः** **prabhakar_marathe@yahoo.com**

## मनोगत

-जयंत र. मराठे(पृ.५११) २१, गायत्री हाउसिंग सोसायटी, २१५ पर्वती गांव पुणे ४११००९;
दूरध्वनी-२४४४१११७

दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील 'हॅलो सखी' कार्यक्रम पहात होतो. कार्यक्रमाचे स्वरुप कामगार वर्गाच्या अडचणी त्यांच्या समस्याबाबत चर्चा व प्रश्नोत्तरे असे होते. एका निवृत्त कामगाराने प्रश्न विचारला की आम्ही कामावर असतांना पेन्शनची केस खालच्या कचेरीत जिंकली आहे. पण मालक वरिष्ठ कोर्टात गेले. केस अद्याप प्रलंबित आहे. आता मी ज्येष्ठ नागरिक झालो. कोर्टाचा निर्णय अद्याप नाही. आमच्या हयातीत निकाल लागणार का? प्रलंबित केसेसची प्रचंड संख्या न्यायमूर्तींची अपुरी संख्या यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे प्रश्नकर्त्याला सांगण्यात आले.

दूरदर्शनच्या दुसऱ्या एक वाहिनीवरुन केंद्र सरकारांतील कोळसा खात्याचे मंत्री शिबू सोरेन यांना न्यायालयाने त्यांच्या सचिवाच्या खून प्रकरणी दोषी ठरविले व पंतप्रधानांनी त्यांचा राजीनामा घेतल्याचे वृत्त देण्यात येत होते. आणि पुढे संबंधित मंत्री प्रकृती अस्वास्थ्यामुळे 'आय.सी.यू.' - विशेष दक्षता विभागांत दाखल झाल्याचे सांगण्यात आले.

दूरदर्शनवरची तिसरी बातमी अशीच निराळी होती. प्रख्यात अभिनेते संजय दत्त यांना मुंबई बॉंबस्फोट खटल्यातील टाडा न्यायालयाने खटल्याच्या कट कारस्थानाच्या आरोपांतून मुक्त केले होते व केवळ शस्त्रास्त्र कायद्याखाली दोषी ठरविले.

दूरदर्शनच्या या सर्व बातम्या पहातांना, ऐकतांना मनाला वेदना होत होता. ज्यानी समाजाला मार्गदर्शन करायचे, योग्य निर्णय घेऊन प्रशासन चालवायचे, त्यांच्यावर खुनाचे खटले. वर ज्यानी करमणुकीच्या विश्वात नविन येऊ पहाणाऱ्या कलावंताना उत्तेजन द्यायचे. सामान्य लोकांनी ज्यांचे अभिनय कौशल्य पाहून कौतुक करायचे ते शस्त्रास्त्र कायद्याचे उल्लंघन करणार.

तिन्ही बातम्यांतील वा माहितीतील एकही घटना आश्वासक नव्हती. वयाच्या साठीतही जर निवृत्ती वेतनासाठी वाट पहावी लागणार असेल आणि त्याची कालमर्यादा माहित नसेल तर स्वांतत्र्य मिळून ६० वर्षे होत आली तरी आपण नेमके कोठे आहोत. या विचाराने मन संभ्रमित झाले. देशांत मोबाईल वापरणाऱ्यांची संख्या कशी वाढतेय, मेट्रोज मध्ये कार्पोरेटस मध्ये नानाविध मॉल्स सुरु करण्याबाबत चालू असलेली चुरस आणि वाढत्या पंचतारांकित हॉटेलची आकडेवारी देणाऱ्या बातम्या यांचा आणि तर प्रथम उल्लेखिलेल्या तीन घटनांचा मेळ कसा घालायचा हा प्रश्नच आहे. आम्ही प्रगती करतोय का? कि आमची सांस्कृतिक व सामान्य नीती मूल्यांबाबत अधोगती होत आहे? आम्ही येत्या पंधरा वीस वर्षात आर्थिक महासत्ता होणार यावर विश्वास ठेवायचा का परदेशी कंपन्यांच्या समुहांना सर्वच क्षेत्रांत घुसायला वाव देऊन एक वेगळी आर्थिक गुलामगिरी येणार? कशाचेच उत्तर नीट मिळत नाही. आजच्या युवा पिढीने नेमके काय करायचे? शिक्षण आणि रोजगाराच्या समस्यांनी त्यांचा गोंधळ होत आहे. आणि त्यामुळे एक अस्वस्थतेचे वातावरण निर्माण होत आहे, असे जाणवू लागले आहे. पण या अशा थोड्याशा निराश गोंधळाच्या स्थितीत एखादी बातमी मनाला उभारी देणारी देशभक्तीने प्रेरित करणारी. कर्तव्यबुद्धीला उभारी देणारी आढळते. आणि मग विचारांची साखळी पुनः आशादायक भविष्याकडे वळते.

आणि ही आशादायक व अंतर्मुख करणारी बातमी होती. मेजर पितांबरे यांच्या शौर्याची अवघ्या बत्तीस वर्षाच्या या लष्करी अधिकाऱ्याची भारत - पाक सीमेवर अतिरेक्या बरोबरच्या चकमकीत आहुती पडली होती. पण आपल्या मृत्युपूर्वी त्याने हिजबूल मुजाहिद्दीनच्या 'मोस्ट वॉंटेड' कमांडरला कंठस्नान घातले होते. बाजीप्रभू आणि तानाजीचे अंश अजुनही आपल्या देशात आहेत ही भावना मनांत येऊन गेली. काळोखाच्या आणि असुरक्षित, अस्थिरतेच्या या वातावरणांत प्रकाशाचे असे किरणच भविष्यकाल तेजोमय करतील. या विचाराने मन कसे शांत झाले! -०-

---

*(विवाह संस्कारांचे महत्त्व-पृ.८ वरून)*

साहचर्याने या टप्प्यावर मनुष्याला पूर्णत्व प्राप्त होते. मानवी जीवनाची वाटचाल पुढे चालावी म्हणून प्रजोत्पादन आणि मागील पीढीने केलेल्या उपकारांची जाणीव ठेवून केलेले श्राद्ध-तर्पण अशा उभयविध कर्मांनी दोन्ही पिढ्यांना सांधणारे सूत्र म्हणजे हा गृहस्थाश्रम म्हणून याचे विशेष महत्त्व. अशा या महत्त्वपूर्ण आश्रमाची सुरुवात म्हणजे विवाह. जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या जीवनात जे सोळा संस्कार भारतीय परंपरेने मानले त्यापैकी विवाह-संस्कार विशेष महत्वाचा.

विवाहसंस्काराचे देशकाल परिस्थितीला अनुरूप अनेक विधी सम्मत आहेत. परंतु महत्वाचे आणि सार्वत्रिक (अर्थात् भारतीय परंपरेत सार्वत्रिक, वैश्विक नव्हे) असे विधी पाच आहेत.

**१)कन्यादान**: वधुपिता-'धर्मे च अर्थे च कामे च न अतिचरितव्या त्वया इयम्!' (अर्थात जीवितसाध्यांचे बाबतीत वराने वधूला सहभागिनी करावे, तिची उपेक्षा करु नये.)

वर - न अतिचरामि (वर देखील, 'मी तिची उपेक्षा करणार नाही 'असा शब्द देतो.)

**२)विवाहहोम**: (पाणिग्रहण) यात अन्तर्बाह्य शुचित्वासाठी आणि देवतापरिग्रहार्थ, सौख्यासाठी, समृद्धीसाठी अग्नीची प्रार्थना करावी. अग्नि हा पवित्र आणि निःपक्षपाती म्हणून श्रेष्ठ मानला जातो. म्हणून त्याच्या साक्षीने वधू -वरांनी प्रतिज्ञित व्हावे असा संकेत.

**३)सप्तपदी**: 'हे वधू, तू (१)पुत्रवती (२) बलवती (३)धनवती (४)सुखयुक्ता (५)प्रजावती (६) भोगवती (७)सखीरुपिणी हो.' सहजीवनातील ही सात ईप्सिते. प्रत्येक पाऊलावर एकेका अपेक्षेचा उल्लेख करुन शेवटी सख्यत्वाची अपेक्षा.

**४)जयमाला** : अग्नि, देव, ब्राह्मण, आप्तस्वकीय या सर्वांच्या साक्षीने परस्परांना जयमाला घालणे-परस्परांची स्वीकृती सांगणारा विधी.

**५)गृहप्रवेश** : कपाळी सौभाग्यतिलक लावलेल्या गृहलक्ष्मीने धान्यरुपी लक्ष्मीला लवंडून प्रवेश करावा. धान्यवृद्धी सूचित करणारा विधी.

प्रत्येक विधीचे वेळी या ना त्या रूपाने तेजाची उपस्थिती आवश्यक. देवाजवळ दिवा लावणे, ओवाळणे, यज्ञीय अग्नी चेतविणे, इ. अग्नि-अर्थात् तेजतत्त्व , याला फार महत्त्व आहे. जठराग्नि मंदावला तर अनारोग्य होते, विझला तर मृत्यु येतो. जन्मापासून मृत्यूपर्यंत याच तेजाची साथ असते. याच अग्नीत शेवट असतो. त्याच्यासारखा अन्य साक्षीदार नाही म्हणून प्रत्येक विधीमध्ये त्याचे स्मरण. या ना त्या रूपाने त्याचे अस्तित्व आवश्यक मानले आहे.

विवाह हे संस्कारित बंधन आहे. नवीन सामाजिक बांधिलकी इथून पुढे पेलावयाची असते, हे सांगणारा हा विधी आहे. तर असे आहे धर्मशास्त्रप्रणीत विवाहसंस्काराचे महत्त्व. ही आहे भारतीय परंपरा.

-०-

***(फॅमिलीडॉक्टर-पृ.७ वरून)*** म ा ि
त्याची ख्याती जाणून होतो.

“बरं बर” असे म्हणून त्याला वाटेला लावले.

एक महिन्याने परत टपकला.

“अरे, कायरे, एकही केस पाठवली नाहीस?”

“असे बघ. माझ्याकडे केस आली तरच मी पाठवणार ना? मीच काम येण्याची वाट बघत बसलो आहे.”

परत एक महिन्याने स्वारी उगवली. त्या खेपेस त्याने तोंड उघडले.

“विद्वांस, मी तुला कमिशन देईन.”

“बाबू, असे बघ मला तुझी कीर्ती ठाऊक आहे. तुझे हे धंदे मला ठाऊक आहेत. मी त्यातला नाही. सॉरी रॉंग नंबर. मी तुझ्याकडे काम पाठवेन, अशी आशा बाळगू नकोस.” असे मी परखडपणे दटावताच स्वारी मुकाट्याने निघून गेली.

मध्यंतरी दहा एक वर्षे गेली असतील. एकदा त्याची व माझी रस्त्यात दृष्टभेट झाली. त्याच्या डोक्यात सणक आली असावी. माझ्या पाठोपाठ तो दवाखान्यात आला. मला म्हणाला,

“विद्वांस, तू काय पण मारला आहेस का, की माझ्याकडे काम पाठवायचे नाहीच?”

“बाबू, असे बघ. एवढ्या वर्षांत तू बदललास का? नाही. मी बदललो का? नाही. आपण दोघेही सुखात आहोत ना? मग तसेच राहू या. तु तुझ्या मार्गाने जा, मी माझ्या मार्गाने जातो. मी तुला सुधारायचा प्रयत्न करणार नाही आणि तू मला बिघडवण्याचा प्रयत्न करू नकोस. आपण कशाला आता एकमेकांना मिठ्या मारायच्या?” - मी.

“विद्वांस, तुला काय वाटते, तू ज्यांच्याकडे काम पाठवतोस ते काय कमिशनचा धंदा करत नाहीत?” त्याने बिनधास्त सवाल केला.

मला प्रचंड संताप आला. कारण ज्यांच्याकडे माझे काम होते त्या व्यक्ती मला गुरुस्थानी होत्या, आदरणीय होत्या. त्यांच्या चारित्र्यावर हा शिंतोडे उडविणार? वारांगनेने शीलवतीबद्दल बोलावे?

“बाबू, तू वाह्यातपणे बोलत आहेस. तू चालता हो व परत कधी माझ्याकडे येऊ नकोस. तुझे आणि माझे कधीही पटणार नाही.” माझा संताप उफाळून आला. या बाबूची नीतिमूल्ये काय होती त्याचे आकलन मला कधीच झाले नाही.

या ‘चालता हो’ प्रकारानंतर वर्षभराने मी एका लग्नसमारंभात गेलो होतो. यजमानांनी एका प्रथितयश व्यक्तीशी माझी ओळख करून दिली. ती व्यक्ती म्हणाली,

“बरे झाले. तुमची ओळख झाली. तुम्हाला भेटायची मला उत्सुकता होती. कारण मी तुमचा लौकिक ऐकला आहे.”

“काय ऐकलेत माझ्याबद्दल?”

“अहो, तुम्ही त्या बाबूला हाकलून दिलेत.”

“कमाल आहे. तुम्हाला हे कसे समजले? कारण मी त्याला हाकलले तेव्हा तिथे कोणी तिसरी व्यक्ती नव्हती.”

“अहो, त्यानेच मला हे सांगितले. तो म्हणाला की, ‘भायखळा ते माहीम या पट्ट्यातल्या प्रत्येक डॉक्टरला मी उल्लू बनवले. अपवाद फक्त दोन. एक तुमचा मेव्हणा व दुसरा विद्वान्स.’ त्याने हेही सांगितले की, ‘विद्वांसने तर चक्क हाकलून दिले.’ ” मी अचंबित झालो.

हा डॉक्टर मला एकदा उडुप्याकडे भेटला. म्हणाला, “विद्वांस मी तुला मानतो. अरे, हे बाकीचे सारे भ... लालचू.”

या व्यक्तिरिक्त इतर कोणीही कधीही मला कमिशन देण्याचा प्रयत्न केलेला नाही. असेही असू शकते की, माझ्या गंभीर, थोडाशा उग्रतेकडे झुकणाऱ्या व्यक्तिमत्त्वाकडे बघून कोणाला तसे धाडस करावेसे वाटत नसावे. मी हाणणार याची खात्री वाटत असावी. मी कोणाकडूनही एक पैसाही कमिशन घेतलेला नाही. तशी अपेक्षाही कधी माझ्या मनाला शिवलेली नाही.

### (७) वैद्यकीय व्यवसाय की धंदा?

वैद्यकीय व्यवसायाला हे असे अनिष्ट वळण का लागावे? विचार करता असे जाणवते की पूर्वी हा निखळ व्यवसाय मानला जात होता आणि तसा तो होता. त्यामुळे बोलण्या-चालण्याची, वागण्याची, आर्थिक व्यवहाराची सगळीच रीत वेगळी होती. समाजापुढले आदर्श वेगळे होते. आता बहुतांशी डॉक्टर हा व्यवसाय नसून एक प्रकारचा धंदा, व्यापार आहे असे मानू लागले आहेत. गुणात्मक दृष्टीने हा फार महत्त्वाचा बदल कसा काय झाला? कारणे अनेक आहेत; परंतु त्यातल्या त्यात समाजाच्या नीतिमूल्यांतील बदल आणि वैद्यकीय शिक्षणाचे झालेले व्यापारीकरण ही महत्त्वपूर्ण कारणे ठरतात.

### समाजाची झालेली गुणात्मक घसरण

डॉक्टर हा समाजाचाच एक घटक असतो, त्यामुळे समाजात होणाऱ्या बदलांचे प्रतिबिंब वैद्यकीय व्यावसायिकांत दिसणारच. समाजाची ५० वर्षांपूर्वीची नीतिमूल्ये व आजची नीतिमूल्ये यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. राजकारण, समाजकारण अशा प्रत्येक क्षेत्रात गुणात्मकदृष्ट्या कमालीची घसरण झालेली आहे. पंडित नेहरू, लालबहादूर शास्त्री यांच्या तुलनेत विश्वनाथ प्रताप सिंग आणि देवेगौडा हे अगदीच खुजे वाटतात, नव्हे ते तसे आहेतच. कठोर मेहनतीने आर्थिक साम्राज्य निर्माण करणारे टाटा, बिर्ला हे आताचे आदर्श राहिलेले नाहीत. आता जमाना सुखराम, तेलगी आणि भोसले यांचा आहे. हे आजचे नवे आदर्श आहेत. राजकीय पुढारी - यात सर्व पक्षांचे पुढारी आले - त्यांचे उदात्तीकरण करतानाही आढळतात. सुखरामला कोणी जवळ केले? भोसलेला वाचविण्यासाठी कोण धावपळ करीत होते? पैसे कसे कमावले याला महत्त्व नसून ते किती कमावले याचेच कौतुक केले जाते. तरुण पिढीला बोफोर्समध्ये काही गैर वाटत नाही. “त्यात काय आहे? खरेदीव्यवहार झाला तेव्हा कमिशन घेतले असणारच. त्यात गैर काय?” अशाच विचारसरणीने वैद्यकीय व्यवसायिकांवरही पगडा प्रस्थापित केला. या अधःपतनाचे मी समर्थन करीत नसून केवळ वस्तुस्थिती काय आहे ते दर्शवीत आहे. दळण यंत्रात जर किडके धान्य घातले तर पीठ चांगले यावे अशी अपेक्षा कशी करता येईल?

### चंगळवादाचा पगडाः

आजकाल समाजात चंगळवादाचा जबरदस्त पगडा पसरला आहे. गरजा भागल्या तरी हाव संपत नाही. कितीही कमावले तरी समाधान वाटत नाही. अनावश्यक गोष्टींवर खर्च वाढवून ठेवलेले असतात. मग येनकेन प्रकारेण जास्तीची कमाई करणे हे ओघाने आलेच. परिस्थिती प्रतिकूल असेल तर मग वाममार्गाचा आसरा घेतला जातो. फारतर सुरुवातीस मनाला टोचणी वाटते, पण मग मन निर्ढावते. घरातील व्यक्तींचाही दबाव असतो.

“शेजाऱ्यांनी बघा होंडा सिटी घेतली आणि तुमची अजून मारुती झेनच? त्यांनी प्लाझ्मा टेलिव्हिजन घेतला, तुमचा अजून एल्सीडीच?”

ही हाव माणसाला अनैतिक, बेकायदेशीर कृत्ये करायला उत्तेजित करते, भाग पाडते. या चंगळवादापासून दूर राहायला वैद्यकीय व्यवसायी आहे का?

### (८)वैद्यकीय शिक्षणाचे व्यापारीकरण

वैद्यकीय शिक्षणाचे व्यापारीकरण हा फार महान कळीचा मुद्दा आहे. हा एक गहन विषय आहे. त्यावर एक प्रबंधही लिहिता येईल. वाढत्या लोकसंख्येला सेवा देण्याकरिता जास्तीचे डॉक्टर उपलब्ध व्हावेत याकरिता नवीन वैद्यकीय

महाविद्यालये सरकारने काढावयास हवी होती. प्रश्न होता वित्ताचा व इच्छाशक्तीचा. सरकारला हा खर्च करायचा नव्हता. इच्छाशक्तीचाही अभाव होता. म्हणून खासगी संस्थांना परवानगी देऊन सरकारने आपल्यावरील जबाबदारी झटकली. इतकेच नव्हे तर अशी कॉलेजे प्रस्थापित करणाऱ्यांचे सरकारमध्ये वजन आहे. त्यातले काहीजण मंत्रिपद भूषवीत होते. ज्या संस्थांनी अशी वैद्यकीय विद्यालये काढली ते या व्यवहाराकडे दुभती गाय म्हणून बघतात. परिणामी हा ब्रह्मराक्षस जनतेच्या मानगुटीवर बसला. हे नवे संस्थानिक निर्माण झाले. शिक्षणमहर्षींचे दिवस संपले. आता शिक्षणसम्राटांचे युग चालू आहे. त्यांना शिक्षण उद्योगपती असेही संबोधायला हरकत नसावी. अनेक लाख रुपये देणगी ( ?) देऊन प्रवेश घेतला जातो. सरकारी अथवा म्युनिसिपल मेडिकल कॉलेजची वर्षाची फी आहे अठरा हजार रुपये. खासगी मेडिकल कॉलेजात तरी गुणवत्तेवर प्रवेश मिळाला तरी वर्षाची फी आहे साडेतीन लाख रुपये. म्हणजे पाच वर्षांचे झाले साडेसतरा लाख. डोनेशन सीटकरिता किती मोजावे लागतात हे फक्त देणारे व घेणारे जाणतात. हा सगळा 9अंडर''का मामला असतो. हे पैसे सामान्य माणूस कसे उभे करतो हे मला पडलेले कोडे आहे. आयकर खाते कधी याची चौकशी करताना आढळत नाही. "अरे, तुझ्या बापाने प्रवेशाकरिता एवढे पैसे दिले. मग आता तुला उत्तीर्ण करायला मलाही थोडेफार मिळायला हवेत. मलाही पोट आहे की!" असे म्हणणारे शिक्षकही जन्माला आले. मुलांनाही वाटू लागले की, आपले पालक जर इतके पैसे देऊ शकत असतील तर डॅडीकडे आणखी कितीतरी असतील. यामुळे वृत्तीतच फरक झाला. एवढे लाख खर्चून काय जनरल प्रॅक्टिशनर व्हावयाचे? छे. छे. स्पेशॅलिस्ट व्हायला हवेच. परत देणगीचा प्रश्न उभा राहिला. असे बोलले जाते की, रेडिऑलॉजी या विषयाच्या पदव्युत्तर प्रवेशासाठी बेळगाव येथे पंचवीस लाख मोजावे लागतात. खरे-खोटे कोण जाणे! आता मला कोणीही पटवून द्यावे की, एवढी मोठी रक्कम खर्च केल्यानंतर त्या डॉक्टरच्या मनात व्यवसाय असा विचार कधी डोकावेल का? तो धंदाच करणार. त्याच्या मनावर प्रथम दबाव असतो तो ती गमावलेली रक्कम लवकरात लवकर परत हापसण्याचा. सेवाभाव, समाजाचे ऋण असे कोणी काही बोलू लागला तर अशा व्यक्तीच्या मानसिक संतुलनाबद्दल शंका घेतली जाते. सेवाभाव, समाजाचे ऋण या संकल्पना उदात्त जरूर आहेत; परंतु त्या आता कालबाह्य झाल्या आहेत. हल्लीच्या पिढीला हा सगळा बकवास वाटतो. एवढी रक्कम खर्च करून जे डॉक्टर होतात त्यांच्या 'ज्ञानाचा दर्जा' हा एक वेगळा संशोधनाचा विषय आहे. याचे कारण असे की, बऱ्याच व्यापारी वैद्यकीय महाविद्यालयांकडे सुसज्ज रुग्णालय नसते. वैद्यकशास्त्राचे ज्ञान रुग्णांभोवती संपादन करायचे असते. केवळ पुस्तके वाचून ते प्राप्त होत नाही. नाहीतर घरी बसून इंटरनेटवरून कोणालाही डॉक्टर बनता आले असते. एकंदरीत या देणगी वैद्यकीय महाविद्यालयांनी संपूर्ण वैद्यकीय व्यवसायाचा ढाचाच बदलून टाकला आहे. यात समाजाचे हित आहे का? विचार करा.

### (९) वाममार्गाचा अवलंब

प्रॅक्टिसमध्ये झटपट यश प्राप्त व्हावे म्हणून कट् प्रॅक्टिसचा आधार घेतला जातो. एकदा या मार्गाचा अवलंब सुरू झाला की, मग मागे फिरता येत नाही. बऱ्याचजणांच्या मनात तसा विचारही येत नाही. आता एकदा का अनैतिकतेचा आसरा घेणे सुरू केले की मग इतर अनिष्ट गोष्टी ओघाने आल्याच. आवश्यकता नसलेल्या चाचण्या करणे. त्या करतानाही कशी लबाडी चालते बघा. रुग्णाला सात चाचण्या करण्याबद्दल कागद दिला जातो. या सातच्या सात चाचण्या केल्या जात नाहीत. विशिष्ट खूण केलेल्या चाचण्या केल्या जातात. बाकीच्यांचा 'नॉर्मल' असा अहवाल दिला जातो. आकार मात्र सात चाचण्यांचा लावला जातो न केलेल्या चाचण्यांत भागीदारी. सारे कसे गोड गोड. आवश्यकता नसताना शस्त्रक्रिया केल्या जातात. "तू कशाला कुरकुरतोस? तुला काय करायचे आहे? तुझा कट् मी देणार आहेना?" काही श्रम न घेता हजारोंनी कमाई करण्याचा हा मार्ग आहे.

### आदरभावाला लागलेले ग्रहणः

समाजात होत असलेला आणखी एक लक्षणीय बदल प्रकर्षाने जाणवत आहे. एकंदरीत दुसऱ्याबद्दलचा आदरभाव कमी झाला आहे. लहान मुले शिक्षकांबद्दल काय बोलत असतात ते जरा बारकाईने ऐका. पण हा त्यांचा दोष असतो का? घरात काय शिकवणूक मिळते हे महत्त्वाचे असते. शिक्षण संस्थेचे काम करीत असताना एकदा मी शिक्षण संकुलाच्या मैदानातून जात होतो. दोन मुले भांडत होती. लहान मुलांनी भांडण करणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे असे मी मानतो. त्यांचे भांडण निर्लेप असते. ते निर्लेप असल्याने मनाला चिकटत नाही. त्यामुळे ते फार काळ टिकत नाही. मोठ्यांचे भांडण हे मतलबी असते. ते पिढ्यान्‌पिढ्या टिकते. मी दुर्लक्ष करून पुढे चाललो होतो. तेवढ्यात एका मुलाने दुसऱ्यास एक शिवी हासडली. मी चटकन मागे वळलो आणि त्या मुलाला जवळ बोलावले.

"अरे, तू जो शब्द उच्चारलास त्याचा अर्थ तुला माहीत आहे का?"

"नाही."

"मग तू हा शब्द का वापरतोस? तू कोणाकडून हा शब्द उचललास?"

"माझे बाबा रागावले की हा शब्द नेहमी उच्चारतात."

आता मला सांगा की या मुलाचा काय दोष? त्याला चमकवण्यात काहीच अर्थ नव्हता. मी त्याला एवढेच म्हटले की, "तो शब्द चांगला नाही तर तो तुझ्या तोंडातून काढून टाक."

तो मुलगा मात्र विचारात पडला असणार की माझे बाबा तर तो शब्द नेहमी वापरतात मग हे काका मला असे का सांगत आहेत? सर्वच काही बदलले आहे. शिक्षकाला 'मास्तरडा' म्हणण्याची प्रथा पडली आहे. मुलांना कसा आदर वाटावा त्यांच्याबद्दल? आमच्या लहानपणी शाळेत जर मास्तरांनी दोन छड्या मारल्या तर घरी तक्रार करता येत नसे. तक्रार केल्यास 'तू नक्कीच काहीतरी वाह्यातपणा केला असशील' असे म्हणून दोन फटके मिळत.

हल्लीचे आईबाबा 'माझ्या मुलाला हात का लावला? कोर्टात खेचेन,' अशी धमकी देतात आणि तीसुद्धा आपल्या मुलाच्या देखत. जरा तरी विवेक असावा. मुलांच्या देखत काय बोलावे व काय बोलू नये याचे भान ठेवले जात नाही. याचे दूरगामी परिणाम काय होतील हा सारासार विचार नसतो. एकंदरीत दुसऱ्याबद्दलची बेफिकिरी वृत्ती वाढली आहे. हे योग्य आहे का? (क्रमशः पुढे चालू-भाग ३ :पुढील अंकी)

शेवटचे पान-शेवटचा संवाद

**मुखपत्राचे खरे प्रयोजन (-तरी काय?)**

संस्थेच्या मुखपत्रामध्ये साहित्यिक मजकूर हा गौण असून संस्थेच्या ध्येय धोरणानुसार अंगीकृत योजनांचा, उपक्रमांचा, कार्यकलापांचा आढावा, सभासदांचा गुणगौरव, सहवेदना, लग्नमुंजी, मानसन्मान, कौतुक सोहळे, मेळावे, संमेलने, वार्षिक व अन्य सभांचे वृत्तांत मोठ्या टाईपात १२-१६ पानांच्या मर्यादेत नियमितपणे ठराविक दिवशी देणे हेच प्रमुख लक्ष्य असावे हा एक प्रामाणिक मतप्रवाह संस्थेच्या हिताची काळजी करणाऱ्या मान्यवर पूर्वसुरींना सामान्यतः अभिप्रेत असतो. २४ पाने वापरून विविध प्रकारच्या सदस्यांच्या वाचनीय (की वाईटसुद्धा) साहित्याला 'कात्री किंवा टोपली' ऐवजी क्वचित संपादकीय संस्करण करून मुक्त वाट करुन देण्याचे थोडेसे खर्चिक धाडस पुढे चालविणे, व त्यासाठी लहान टाईप वापरणे हे खरोखर 'योग्य व क्षम्य' आहे का? आपली मते कळवावी.-सहसंपादक

(मी कलासाधक-पृ. १ वरून )

(मी कलासाधक-पृ. १ वरून )

नवल वाटे! पुढे अनके थोर चित्रकारांचे मार्गदर्शन मला मिळाले. किशोर वयातील हा अनुभव संस्मरणीय होता. कलाकार म्हणून मी एकटीच कलासाधक नसून, माझे कुटुंबियही त्याचे साक्षीदार म्हणून त्या आनंदात सहभागी व्हावेत हा केवढा उदात्त विचार त्यामागे होता.


कला ही जशी आपल्याला अजरामर करते, तशीच ती अध्यात्मिक दृष्ट्या स्वतःला अंतर्मुख व चिंतनशील बनवते. पंचेंद्रियांच्या विकासाला मदत करते. भारतीय प्राचीन कलेतील माझी आवडती भारतीय अलंकारिक लघुचित्रशैली या चित्रांत द्विमित आभास असून चेहऱ्यावर हावभाव न दाखविता सभोवतालच्या वातावरणात प्रतिकात्मक रित्या दाखवितात. सूक्ष्म, लयदार, बारीक व जोमदार रेषा हा भारतीय कलेचा आत्मा आहे. अशा या भारतीय चित्रांचे नुसते दर्शन न घेता त्याचे वाचन करायला शिकले पाहिजे. मोठा आशय त्यात दडलेला असतो. अनेक पानांच्या मजकुराचे काम एका पृष्ठभागावरील, एखाद्या कथाचित्रांत सहज साध्य होते. तेव्हां चित्र वाचण्याची सवय लागल्यास आबालवृद्धांना आनंदाचा ठेवा गवसेल. कलाकाराच्या सौंदर्यनिर्मितीचा निखळ आनंद रसिकांनाही घेता येईल.

कालौघात नष्ट होऊ पहाणाऱ्या या समृद्ध कलेचा प्रसार झाल्यास नवीन पिढीला त्याची ओळख होईल. मी कलासाधक म्हणून धन्य आहेच. परंतु या लेखातून आपणांस चित्रवाचनाची सवय लागल्यास मी स्वतःला अधिक धन्य समजेल.

"या कला सा विमुक्तये"

सुप्रभात





गणेशोत्सव



बैलपोळा

BOOK POST

**If undelivered, please return to:**

**सहायक संपादक,**
**हितगुज**
**श्री.सीताराम गो.खांबेटे**
**ए१३,संपदा सोसायटी**
**स्वामी नित्यानंद मार्ग,**
**अंधेरी-पूर्व,**
**मुंबई ४०००६९**

**त्रैमासिक हितगुज** हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.

**पत्रव्यवहाराचा पत्ताः** सहायक संपादक:श्री.सीताराम गो.खांबेटे,ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग,अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९;
दूरध्वनीः २६८३६९९४; मोबाईल : ९८३३५६४२६८.
**ईमेल** (1) sitaram_khambete@yahoo.com (2) maratheparivar@yahoo.co.in
**वेबसाईट : www.marathepratishthan.org**